पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद.

## वार्षिक अहवाल २०१९-२०२०

महाविद्यालयाची सुरूवात दि. १५ जून २०१९ रोजी झाली.त्याच दिवशी प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या सर्व नियोजनावर चर्चा केली.त्यानुसार सर्व कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याचे ठरले.

### विद्यार्थी परिषद विभाग

१) **गुणवंतांचा सत्कार:-** प्रतिवर्षी प्रमाणे विद्यार्थी परिषदेच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील बी. ए., बी. कॉम, बी.एस्सी व १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेले परिसरातील प्रथम, द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार कार्यक्रमाचे आयोजन दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष व संस्थेचे अध्यक्ष मा. ना. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी भूषविले. प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे सचिव, मा. श्री. शामसुंदर नाईक, उपाध्यक्ष, मा. श्री. देवजीभाई पटेल, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

यावेळी समाजशास्त्र विभागाच्या वतीने समाजशास्त्र विषयातील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कु.ज्योती रमेश उदे हिला "धुपाजी खोतकर" पुरस्कार वर्ष २०१९ प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एस.आर. टकले यांनी केले.या कार्यक्रमात एकूण ४५ विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व पुस्तक देवून सत्कार करण्यात आला.यामध्ये १९ मुले व २६ मुलींचा सहभाग होता.याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होते.

२) **विद्यार्थी प्रतिनिधी व सचिव निवड :-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी परिषद गठीत करण्यात आली. महाविद्यालयातील वर्गप्रतिनिधी व विविध विभागांच्या प्रतिनिधीमार्फत विद्यार्थी परिषद प्रमुखाची निवड करण्यात आली. यामध्ये १५ विद्यार्थी/विद्यार्थींनी सहभाग घेतला. निवडलेल्या विद्यार्थी प्रतिनिधीमधून श्री. राहुल अशोक सरोदे याची सचिव पदी बिनविरोध निवड करण्यात आली. यासंबंधीची बैठक दि. २०/०१/२०२० दुपारी २.०० वा. बैठक हॉल मध्ये संपन्न झाली. त्या बैठकीला बी.ए. प्रथम, द्वितीय व तृतीय, बी. कॉम प्रथम, द्वितीय व तृतीय व बी.एस्सी प्रथम व द्वितीय या वर्गाचे विद्यार्थी/विद्यार्थींनी उपस्थित होते.

३) **सावता भूषण पुरस्कार:-** महाविद्यालयाच्या वतीने प्रतिवर्ष दिला जाणारा सावता भूषण पुरस्कार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विद्यार्थी परिषद समिती मार्फत बी. ए., बी. कॉम. तृतीय वर्षातील पात्र

विद्यार्थ्यांचे अर्ज मागवून त्यातून सर्व निकषात पात्र विद्यार्थ्यांची निवड करून हा पुरस्कार श्री. अमोल कैलास डकले या बी. एस्सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्याची निवड करण्यात आली.

४) **वार्षिक स्नेहसंमेलन:-**प्रतिवर्षी प्रमाणे महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन विद्यार्थी परिषदेच्या वतीने करण्यात आले. स्नेहसंमेलन दि. २३जानेवारी ते २५जानेवारी २०२० या दरम्यान संपन्न झाले. दि. २३ जानेवारी २०२० रोजी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मा. ना. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) (माजी विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य.) यांच्याहस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी मा. श्री. शामसुंदर नाईक (सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद), प्रमुख उपस्थिती मा. डॉ. सतिष देशपांडे (माजी इंग्रजी विभाग प्रमुख, डॉ. बा.आं.म.वि.औ.बाद) यांची उपस्थिती होती. दि. २४/०१/२०२० रोजी महाविद्यालयामध्ये काव्य वाचन, पोस्टर स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्न मंजुषा, क्रीडा स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विविध धार्मिक, देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करण्यात आले. दि. २५/०१/२०२० रोजी स्नेहसंमेलनाचा समारोप समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. मुस्तजीब खान (संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बा. आं. म. वि. औ.बाद), प्रमुख उपस्थिती म्हणून मा. रफिक शेख (हिमालय वीर, महाराष्ट्र पोलीस, औरंगाबाद) तर अध्यक्ष म्हणून मा. श्री. शामसुंदर नाईक (सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद) यांची उपस्थिती होती. यावेळी वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा व वर्षभरातील घेण्यात आलेल्या स्पर्धांमधील विजेत्या प्रथम, द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रोत्याहनपर प्रमाणपत्र व पुस्तक भेट देण्यात आले. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील देण्यात येणाऱ्या सावता भूषण पुरस्काराचे वितरण या समारंभ प्रसंगी करण्यात आले. या पुरस्काराच्या मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी केले. महाविद्यालयाच्या सावता भूषण पुरस्कार बी. एस्सी. तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री. अमोल कैलास डकले याला मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रीय सेवा योजना

## राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर : २०१९-२०

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर दि. ११/०१/२०२० ते १७/०१/२०२० या कालावधीत मौजे लहान्याची वाडी, ता.फुलंब्री, येथे संपन्न झाले. या शिबिरात झालेल्या उपक्रमांविषयी:-

**१) शिबीरापुर्व गावभेट**

सदर मौजे लहान्याची वाडी हे गाव महाविद्यालयापासून जळगाव रोडकडे जातांना पाल फाट्यापासून ५ किलोमिटर अंतरावर असलेले लहान्याची वाडी येथे सात दिवसीय विशेष शिबिर दि. ११ ते १७ जानेवारी २०२० या दरम्यान घेण्यात आले. गावातील स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि गाव वृक्षाच्छादीत करण्याच्या हेतूने "स्वच्छता" ही मुख्य थिम घेऊन काम करण्याचे ठरले.

शैक्षणिका वर्ष २०१९-२० च्या शिबिराच्या आयोजनासंदर्भात दि. ०७ जानेवारी २०२० रोजी सकाळी ८.०० वा. मौजे लहान्याची वाडी येथे शिबिरपूर्व गावभेटीचे म्हणजेच ग्रामस्थांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत सर्व ग्रामस्थांना व्यक्त केलेल्या मनोगतानुसार गावात ठिकठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेवर जमलेल्या कचरा व गवत स्वच्छ करणे, हागणदारीचा प्रश्न मिटविण्यासाठी काही शौच खड्डे करणे आवश्यक असल्यामुळे यावर सर्वांचे एकमत झाले. करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व गावच्या सरपंच श्रीमती सौ. कल्पनाताई लहाने यांच्या संमतीनुसार सदर शिबिराची निकड म्हणून ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धन जागृती या विषयावर भर देण्याचे ठरवल्या गेले.

त्यानंतर कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी परत दिनांक ०९ जानेवारी २०२० रोजी लहान्याची वाडी गावास भेट देऊन शिबिराची निवास व्यवस्था, कार्यक्रमाचे ठिकाण इ. बाबी निश्चित केल्या. त्यासाठी दि. १० जानेवारी २०२० रोजी स्वयंसेवकाचे शिबिरपूर्व प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी प्रा. नितीन माळेगावकर व डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**२) आगमण**

शिबीर पूर्ण सात दिवसाचे होण्यासाठी एक दिवस आगोदर म्हणजे दिनांक १० जानेवारी २०२० रोजी लहाण्याची वाडी गावात स्वयंसेवक मुक्कामी गेले व दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी आवश्यक सर्व सुविधांचे व्यवस्थापन केले.

**३) उद्‌घाटन**

दिनांक ११ जानेवारी २०२० रोजी सकाळी ९.३० वा.शिबिराचे उद्‌घाटन ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्‌घाटक म्हणून डॉ. सतीष जाधव (प्राचार्य, राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाथ्री) लाभले होते, त्यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. उद्‌घाटन प्रसंगी बोलत असतांना डॉ. सतीष जाधव म्हणाले की, त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व उपस्थित ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिन विकास होत असतो असे म्हणाले. ग्रामीणा भागातील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन होय. त्यासाठी गावातील सर्व नागरिकांना आपसातील मतभेद मिटवून एकत्र येणे गरजेचे आहे, असे जाधव यांनी मत मांडले. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर (गटसमन्वयक, रा.से.यो. डॉ. बा. आं. म. वि. औ.बाद) श्री. कांबळे (पोलीस उपनिरीक्षक, फुलंब्री पोलीस स्टेशन) गावच्या सरपंच सौ. कल्पना लहाने, तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री. विष्णू

लहाने (पोलीस पाटील), श्री. बाळू रोकडे (ग्रामसेवक), सौ. परिघाबाई बहादूरे (पंचायत समिती सदस्य) इ. उपस्थित होते. श्री. कांबळे व डॉ. ज्ञानश्वर पाथ्रीकर यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गावकऱ्यांकडून विद्यार्थ्यांना सात दिवसीय शिबिरासाठी त्यांच्या सहभागाची व सहकार्याची अपेक्षा केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी. एम. कल्याणकर, जिल्हा परिषद हायस्कूलच्या मुख्याध्यापिका, प्राध्यापक वृंद आणि गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले. उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रतिनिधी श्री. अमोल डकले यांनी मानले.

**४) योग-प्राणायाम व शारीरिक कसतरती**

शिबिरात दररोज सकाळी योग-प्राणायाम व शारीरिक कसरती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी व एन.एस.एस.प्रतिनिधी यांनी पहाटे ६.०० ते ७.०० या वेळेत योग, सुर्यनमस्कार, विविध आसणे जसे सर्वागासन, चक्रासन, वज्रासन इत्यादी प्रकार शिकविले.

**५) शिबिरातील नाविन्यपूर्ण उपक्रम**

१. **स्वच्छतेसाठी व वृक्ष संवर्धनासाठी प्रभात फेरी:-** गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटावे तसेच एक वृक्ष आपल्या जीवनात किती महत्त्वाचे योगदान देते याविषयी जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात येत होती.

२. **हगणदारी मुक्तीसाठी जनजागृती:-** गावकऱ्यांनी आपले गाव स्वच्छ रहावे म्हणून उघड्यावर शौचाला जाऊ नये. उघड्यावर शौच केल्यामुळे कोण-कोणत्या आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊ शकतात या विषयी स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

३. **एच.आय.व्ही. (एड्स) विषयी जनजागृतीसाठी रक्त तपासणी शिबिर:-** दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील लॅबटेक्निशन श्री. चौबे व श्रीमती काथार यांनी शिबिरातील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक आणि गावकऱ्यांची रक्त तपासणी करुन त्यांना एड्स आहे अथवा नाही याविषयीचा अहवाल लगेच दिला. तसेच एड्स आजार विषयी विद्यार्थी व गावकऱ्यांना माहिती दिली. सदरील शिबिरात १०५ व्यक्तींची एच.आय.व्ही. टेस्ट करण्यात आली. ऊन लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले.

**६) सामाजिक सलोख्यासाठी मकर संक्रात निमित्त हळदी - कुंकू कार्यक्रमाचे आयोजन:-** महाविद्यालयातील स्वयंसेविकांचा गावातील महिला मंडळींशी सलोखा कायम रहावा म्हणून शिबिर समारोपाच्या दिवशी सकाळी सामुहिक हळदी - कुंकू व वान वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयातील ४० स्वयंसेविकांनी गावातील महिलांना देण्यासाठी तीळगूळ व वानाचे सामान आणले

होते. स्वयंसेविकांनी तसेच गावातील काही महिलांनी तीळगूळ, हळदी - कुंकू आणि वान याचे एकमेकींना आदन प्रदान केले. एक आनंददायी सोहळा पार पडला.

७) **व्यवनाधिनते विषयी जनजागृती:-** ग्रामस्वच्छतेच्या वेळेस स्वयंसेवकांना मोठ्या प्रमाणात दारुच्या बाटल्या सापडल्या. तसेच काही गावकऱ्यांनी चर्चे दरम्यान असे सांगितले की, गावात ९०% दारुची व्यसनाधिनता आहे, ज्यामुळे गावाचा म्हणावा तसा विकास होत नाही. म्हणून गावकऱ्यांशी व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम कळावेत म्हणून विविध व्याख्याने, कार्यक्रम व प्रभात फेरीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

८) **श्रमदान:-** शिबिरात दररोज सकाळी ८.०० ते १२.३० या वेळेत श्रमदान घेण्यात आले. यात पुढील कामे करण्यात आली.

१. **गावाची व सार्वजनिक ठिकानांची सफाई:-**शिबिराच्या पहिल्या व उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी स्वंयसेवकांनी गावातील सार्वजनिक ठिकानावरील व निवासाच्या ठिकानाची साफ सफाई केली. समाज मंदिराभोवतालचा परिसर स्वच्छ केला. गावातील सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यलये व शाळेचा आजुबाजुचा परिसर स्वच्छ केला व रस्त्याच्या आजुबाजुला जमा झालेला कचरा गोळा करून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावण्यात आली.

२. **नादुरूस्त नाल्यातील गाळ व कचरा साफ-सफाई:-**सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ओपन ड्रेनेज लाईन आहे. परंतु सततच्या वापरामुळे त्यात केरकचरा जाऊन बंद झाल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरून वाहत असे. नादुरूस्त नाला दुरूस्त करून त्यातील केरकचरा स्वंयसेवकांनी साफ केला.

३. **वृक्षारोपन:-** गावातील प्रवेशद्वारापासूनच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला शिवबाभूळ, आंबा, शिसम, चिंच, कडूलिंब इ. वृक्ष लावले गेले. त्यासाठी स्वयंसेवकांनी ग्रामस्थांनी खड्डे केले होते. त्यात मकर संक्रांतीच्या शुभ दिनी दिनांक १५ जानेवारी २०२० रोजी २० वृक्षांची रोपण करण्यात आली. जि. प. शाळेच्या तसेच गणेश मंदीर परिसरात देखील १० वृक्ष लावण्यात आले. सदरील वृक्षारोपन कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, प्राध्यापक आणि स्वयंसेवक हजर होते.

४. **जि. प. शाळेच्या दोन वर्ग खोल्यांची सफाई:-** जि. प. शाळेच्या दोन वर्ग खोल्या गेल्या ५ वर्षापासून बंद होत्या. एका वर्ग खोलीत तर कटींगच्या दुकानाचे साहित्य व केस पडलेले होते. या दोन्ही वर्ग खोल्यात गुडघ्यापर्यंत धूळ, माती, विष्टा पडलेली होती. जी स्वयंसेवकांनी एका दिवसात स्वच्द केली. ज्यामुळे अनेक वर्षापासून बंद असलेल्या दोन वर्ग खोल्या आता विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी वापरता येत आहे.

५. **शौच खड्डे खोदणे:-** गावातील ज्या कुंटुंबाकडे शौचालये नव्हती अशा ४ कुंटुंबाला स्वयंसेवकांनी ५×६ फुटाचे शौच खड्डे खोदून दिले. एक शौच खड्डा जि. प. शाळेच्या परिसरात खोदण्यात आला. असे ५ शौचखड्डे खोदले गेले.

९) **बौद्धिक सत्र**

विद्यार्थ्यांच्याविविध कला  गुणांचा विकास व्हावा व विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व बहरावे या कल्पनेतून विद्यार्थीमुख बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात दररोज दुपारी ३ ते ४.३० या वेळेत बौद्धिक सत्र ठेवण्यात आले होते.

१. **दिनांक ११ जानेवारी २०२०:-** रोजी बौद्धिक सत्रात प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. मंजुषा नळगीरकर व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी एन. एस. एस. शिबिराचे नियोजन व परिचय सत्र घेतले. ज्यात सात दिवसात केल्या जाणाऱ्या  कामाचे नियोजन, विद्यार्थ्यांनी कोणती शिस्त राखावी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपसात  स्वत:चा परिचय करुन दिला.

२. **दिनांक १२ जानेवारी २०२०:-** रोजीच्या बौद्धिक सत्रात महाविद्यालयातील एन. एस. एस. विभागात प्रभावीपणे कार्य केलेल्या माजी स्वयंसेवक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात सुहास दुतोंडे, पंकज साळवे, संदीप साळवे, सुनिल डिडोरे, गोरक्ष मंडळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. माजी स्वयंसेवक मेळाव्याचे अध्यक्षस्थान प्रा. बाबासाहेब लहाने यांनी भूषविले.

३. **दिनांक १३ जानेवारी २०२०:-** रोजी "व्यसनमुक्ती" या विषयावर महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी स्वयंसेवकांना व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम व व्यसनाधिनते पासून दूर राहण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. सुरेश मुंढे यांनीही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

४. **दिनांक १४ जानेवारी २०२०-** रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, श्री. शामसुंदर नाईक यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली. शिबिरातील स्वयंसेवकांशी उन्नत भारत अभियान आणि ग्रामविकास या विषयावर चर्चा केली. तसेच दुपारच्या सत्रास राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. टी. आर. पाटील यांनी भेट दिली. आपत्ती व्यवस्थापन या विषयावरील बौद्धिक सत्रास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर हे लाभले होते. त्यांनी आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय?, आपत्ती प्रकार आणि स्वयंसेवकाची जबाबदारी या विषयी सवितस्तर मार्गदर्शन केले. सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. टी. आर. पाटील यांनी भूषविले. डॉ. पाटील यांनी अध्यक्षीय समारोपात स्वच्छता व पर्यावरण संवर्धन या संकल्पने मागील विद्यापीठाची भूमिका या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कोल्हापूर येथील पूर ग्रस्तांना मदतीसाठी विद्यापीठाच्या एन. एस. एस. प्रतिनिधींनी केलेल्या कामाचे अनुभव कथन ही केले. सरांनी विद्यार्थ्यांसाठी ॲपल बोर आणले होते. ज्याचे वाटप कार्यक्रमानंतर करण्यसात आले. बौद्धिक सत्र संपल्यावर पाटील सरांनी शिबिरात आत्तापर्यंत केलेल्या कामाची पाहणी केली व विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक केले.

**५. दिनांक १५ जानेवारी २०२०:-** रोजी बौद्धिक सत्रात "एड्स जनजागृती" या विषयावर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. महेश थोरात यांनी स्वयंसेवकांना एड्स पासून दूर राहण्याचे आवाहन केले.

**१०) व्याख्यान सत्र:**

शिबिरात सायंकाळी ७ ते ९ या वेळेत व्याख्यान सत्र ठेवण्यात आले होते. या माध्यमातून ग्रामस्थांना व स्वयंसेवकांना ग्रामीण समाज जीवनाशी निगडीत विविध विषयावर समाजातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनपर विचार ऐकण्याची संधी निर्माण करण्यात आली.

**१) विविध शासकीय कृषी योजना:-** दिनांक ११ जानेवारी २०२० रोजी सिल्लोड येथील कृषी अधिकारी श्री. व्ही. आर. गोराडे श्रश्रयांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. गोराडे यांनी कृषी विकासासाठी शासनाच्याश्रश्र अस्श्रालेल्या विविध शासकीय योजनांविषयी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या पिकविमा योजना, बि-बियाणे खरेदी अनुदान योजना, पिक कर्ज योजना, विहीर अनुदान योजना, शेततळे योजना, ठिंबक सिचंन योजना, फळबाग अनुदान योजना, रेशीम शेती योजना इ. योजनांविषयी गोराडे यांनी गावकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच गावकऱ्यांच्या मनात विविध योजनांविषयी असलेल्या शंकाचे निरसन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावाचे पोलीस पाटील श्री. बाळू रोकडे यांची उपस्थिती होती.

**२) ग्रामस्वच्छता काळाजी गरज:-** दिनांक १२ जानेवारी २०२० रोजी प्रसिद्ध व्याख्याते डॉ. जी. आर. परडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. परडे यांनी त्यांच्या व्याख्यानास ग्रामस्वच्छता काळाची गरज हा विषय मांडला. या प्रसंगी ते म्हणाले की, ग्रामविकासातील सर्वात मोठा अडसर म्हणजे गावातील अस्वच्छता होय. आज बरीच गावे हागणदारी मुक्त झाली नाहीत. गवात दारा समोरील कचऱ्याचे व्यवस्थापन योग्य रितीने होत नाही, अंतर्गत नाल्यांची व्यवस्था नाही यामुळे रोगराई निर्माण होऊन गावातील व्यक्तींचे आरोग्य धोक्यात येत आहे. त्यासाठी ग्रामस्वच्छता काळाची गरज बनली आहे. डॉ. परडे यांनी ग्रामगितेतील तुकडोजी महाराज यांच्या अभंगाचे संदर्भ देऊन गावकऱ्यांना ग्रामस्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी ग्रामस्वच्छते बरोबरच व्यक्तिगत स्वच्छता ठेवण्याचे आवाहन केले. सदरील व्याख्यान कार्यक्रमास ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद लाभला.

**३) महिला आरोग्य आणि शिक्षण:-** दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी सकाळी ९ ते १० या वेळेत गावातील महिलांसाठी गणपती मंदीर येथे विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाधिकारी डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी गावातील महिलांशी महिला आरोग्य आणि शिक्षण या विषयावर संवाद साधला. याप्रसंगी त्या म्हणाल्या की प्रत्येक कुटुंबात मुलाला आणि मुलीला शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. महिला शिक्षित झाल्या तरच त्या स्वावलंबी बनतील व

जीवनात येणाऱ्या अडचणींना सामर्थ्याने तोंड देतील. ग्रामीण महिलांमध्ये अनेमिया, थायरॉईड, बी. पी., शुगर, गर्भपिशवीशी संबंधीत विविध आजार पहायला मिळतात. म्हणून महिलांनी आपल्या आरोग्याची काळाची घेण्यासाठी योग्य आहारा सोबतच योगा-प्राणायाम करणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान गावच्या सरपंच सौ. कल्पनाताई लहाने यांनी भूषविले. कार्यक्रमाला गावातील महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

४)**शिवनिती आणि प्रासंगिकता:-** दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. विजय पांडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा. विजय पांडे यांनी शिवनिती आणि प्रासंगिकता या विषयावर गावकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाजी महाराजांचे शेतकऱ्यांसंदर्भात आणि कृषी क्षेत्राच्या विकासासंदर्भात जे विचार होते ते आजही कसे उपयोगी ठरु शकतात याविषयी त्यांनी गावकऱ्यांशी चर्चा केली आणि शिवाजी महाराजांचे कृषी विषयक विचार जीवनात अंगिकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणूना महाविद्यालयातील वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख डॉ. महेश थोरात यांची उपस्थिती होती.

५) **पशुधन व्यवस्थापन:-** दिनांक १४ जानेवारी २०२० रोजी सायंकाळच्या व्याख्यान सत्रात फुलंब्री येथील पशुधन विकास अधिकारी डॉ. विजय थोरात यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. थोरात यांनी आपल्या व्याख्यानात पशुधन व्यवस्थापन या विषयावर ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. कृषी क्षेत्राला पुरक व्यवसायाची जोड मिळाली तर शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारु शकते त्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्याकडे असलेल्या पशुधनाचे (शेळी, मेंढी, कोंबडी, वराह इ.) योग्य व्यवस्थापन करावे. पशुधन व्यवस्थापनाच्या तांत्रिक बाबींची माहिती श्री. थोरात यांनी दिली. फुलंब्री येथील बंदीस्त शेळीपालन उद्योजक श्री. रवी राजपूत यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात बंदीस्त शेळीपालन उद्योग शेतकऱ्यांना कसा किफायतशिर ठरु शकतो याविषयी मार्गदर्शन केले.

६) **पाणी फांऊडेशनची जल संवर्धनातील भूमिका:-** दिनांक १५ जानेवारी २०२० रोजी पाणी फांऊडेशनचे कार्यकर्ते श्री. अस्लम बेग यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री. अस्लम बेग यांनी आमीर खान आणि किरणराव यांची एन. जी. ओ. असलेली पाणी फांऊडेशनच्या माध्यमातून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त गावात जलसंधारणाची कामे कश्या पद्धतीने करण्यात आली आहेत याविषयी श्री. बेग यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पाणी फांऊडेशन गावातील सर्व गावकऱ्यांना सोबत घेऊन नदी खोलीकरण, शेततळे बंधारे, बंधारे बांधणे, तळ्यातील गाळ काढणे इ. कामे करतात. जलसंवर्धनासाठी शासनावर अवलंबून न राहता सामुहिक प्रयत्न होणे गरजेचे आहे असे मत श्री. बेग यांनी मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. रामकिशन लोमटे यांनी भूषविले.

७) **मा. ना. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांची सदिच्छा भेट**:- दिनांक १५ जानेवारी २०२० रोजी संस्थेचे अध्यक्ष व माजी विधानसभा अध्यक्ष श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी शिबिरास सायंकाळच्या सत्रात भेट दिली आणि गावकऱ्यांशी संवाद साधला. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) यांनी गावकऱ्यांशी ग्रामस्वच्छता, कृषी विकास, जलसंवर्धन आदी विषयावर चर्चा केली.

८) **बदलते हवामान व पिक पद्धती आणि ठिंबक सिंचन**:- दिनांक १६ जानेवारी २०२० रोजी सामाजिक कार्यकर्ते श्री. जी. बी. खंडागळे आणि महाविद्यालयातील हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. दत्तात्रय येडले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यता आले होते. श्री. जी. बी. खंडागळे यांनी "बदलते हवामान व पिक पद्धती" या विषयावर मार्गदर्शन केले. मराठवाड्यात मागील पाच वर्षापासून दुष्काळजन्य परिस्थिती आहे. यावर्षी पाऊस चांगला झाला असला तरी तो पुढे होईलच असे नाही. अल्प पर्जन्यमान आणि बदलते हवामान लक्षात घेता आपण आपली पिक पद्धती देखील बदलली पाहिजे. ज्या पिकांना कमी पाणी लागते, ज्या पिकांवर रोगराई पडत नाही अशी पिके घेण्याचा प्रयत्न शेतकऱ्यांनी केला पाहिजे असे मत श्री. खंडागळे यांनी व्यक्त केले. डॉ. दत्तात्रय यांनी "ठिंबक सिंचन" या विषयावर ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. ठिंबक सिंचनच्या माध्यमातून पिकांच्या मुळाला व जेवढे आवश्यक आहे तेवढेच पाणी देता येते ज्यामुळे पाण्याचा अपव्यय न होता चांगले पिक घेता येते असे मत डॉ. येडले यांनी व्यक्त केले. शासन ठिंबक सिंचनासाठी अनुदान देते त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अश्विन रांजणीकर यांनी भूषविले होते.

**११) सांस्कृतिक कार्यक्रम**

गावकऱ्यांचे मनोरंजनातून उद्‌बोधन व्हावे या दृष्टिने शिबिरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ९.३० ते १०.३० करण्यात आले.

**१.** दिनांक ११ जानेवारी २०२० रोजी गावकऱ्यांचा व शिबिरार्थींचा संवाद घडवून आणला.

**२.** दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी लहान्याची वाडी येथील महिला मंडळींनी ओवी व लोकगिते यांचे सादरीकरण केले.

**३.** दिनांक १५ जानेवारी २०२० रोजी गावातील लहान मुलांचा आणि स्वयंसेवकांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

**१२) शिबीर समारोप**

दिनांक १७ जानेवारी २०२० रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत शिबिराचा समारोप झाला.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. संजय सांभाळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण केली जाते. शिबिराच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण केली जाते. ही सामाजिक जाणि घेऊन तयार झालेला युवक त्याच्या भविष्यकाळात समाज व राष्ट्र विकासात मोलाचे योगदान देऊ शकतो. या समारोप समारंभास श्री. पंढरिनाथ लहाने, तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री. विष्णू लहाने, ग्रामपंचायत सदस्य श्री. गणेश लहाने व ग्रामस्थ उपस्थित होते. श्री. विष्णू लहाने यांनी तुकडोजी महाराज यांचा फोटो महाविद्यालयास भेट दिला. यावेळी प्रा. नितीन माळेगावकर यांनी शिबिर कार्यक्रमातील विविध उपक्रमांचे अहवाल वाचन केले. त्यानंतर शिबिरासंदर्भातील मनोगते गावकऱ्यांनी व्यक्त केली. ज्यात श्री. पंढरिनाथ लहाने व श्री. विष्णू लहाने या ग्रामस्थांचा समावेश होता. स्वयंसेवकांपैकी श्री. अमोल डकले, श्री. राहूल सरोदे, कु. रुपाली नागरे, कु. मानसी पवार इ. यांनी आपली मनोगते व्यक्त केली. समारोप सत्रास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी असे मत व्यक्त केले की, गावाचा विकास सामुहिक प्रयत्नातून होऊ शकतो त्यासाठी गावकऱ्यांनी आप-आपसातील मतभेद , गट-तट बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे आहे. समारोप सत्रास ग्रामस्थ, महिला, महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. शिबिर समारोप सत्राचे आभार डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडले.

## आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग

**अ) महाविद्यालयलीन स्तरावरील उपक्रम:**

१) **मराठवाड्यातील दुष्काळ या विषयावर व्याख्यान:**-विभागाच्या वतीने दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी विद्यापीठ वर्धापन दिनाचे औचित्य साधून "मराठवाड्यातील दुष्काळ" या विषयावर डॉ. सचिन मोरे (राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री) यांच्या व्याख्यानाच्या कार्याक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, दुष्काळाचे दोन प्रकार आहेत, ओला दुष्काळ व कोरडा दुष्काळ. मराठवाड्याला प्रामुख्याने कोरड्या दुष्काळाला सामोरे जावे लागते. मराठवाड्यातील दुष्काळाला प्रामुख्याने भौगोलिक परिस्थिती जबाबदार आहे. मराठवाड्याकडे मौसमी वारे येताना प्रामुख्याने कोरड्या स्वरुपाचे येतात. ढगांच्या मार्गामध्ये सह्याद्रीच्या मोठ्या रांगा आल्याने मराठवाड्यातील जास्त पाऊस पडत नाही. त्यामुळे येथील बहुतांश शेती कोरडवाहू आहे. या दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी मराठवाड्यातील लोकांनी शेतीपूरक व्यवसाय सुरु करावेत. तसेच छोटे छोटे उद्योगधंदे सुरु करावेत. उपलब्ध असलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करावा. जलसंवर्धन व उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर या बाबतीत व्यापक जनजागृती होणे गरजेचे आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले होते. प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश कार्यक्रमाधिकारी डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी सांगितला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन स्वयंसेविका कु. दीपाली बोलकर हीने केले तर आभार कु. सीमा जाधव हीने मानले.

२) **निबंध स्पर्धा (मराठवाड्यातील दुष्काळ : कारणे व उपाययोजना):-** मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता व्हावी व दुष्काळ दूर करण्यासाठी त्यांची मते जाणून घेण्याच्या दृष्टीने विभागाच्या वतीने दि. १६ सप्टेंबर २०१९ रोजी "मराठवाड्यातील दुष्काळ : कारणे व उपाययोजना" या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या निबंध स्पर्धेत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी फुलंब्री गावातील कनिष्ठ महाविद्यालयांना कार्यक्रमाधिकारी डॉ. पांडुरंग कल्याणकर व श्री. विनोद तुपे यांनी भेटी दिल्या होत्या. या निबंध स्पर्धेत एकूण ३१ स्पर्धकांनी सहभाग घेतला. या निबंध स्पर्धेत विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधाचे परीक्षण प्रा. बाबासाहेब छबुराव लहाने (राज्यशास्त्र विभाग) यांनी केले. या स्पर्धेत कु. मृणाली मनोरकर हिने प्रथम क्रमांक मिळविला तर कु. स्वाती मेहत्तर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. या स्पर्धकांना विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. संजय मून यांच्या हस्ते अनुक्रमे रु. ३०० व रु.२०० बक्षीस देण्यात आले.

३) **विद्यापीठस्तरीय कार्यशाळेतील सहभाग:-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकांसाठी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाविद्यालयाने सहभाग घेतला. विद्यापीठ स्तरीय विभागाने महाविद्यालयाच्या प्राचार्यांसाठी दिनांक १३/०८/२०१९ रोजी आयोजित कार्यशाळेत / बैठकीत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी सहभाग घेतला. विभागाने महाविद्यालयांच्या कार्यक्रमाधिकाऱ्यांसाठी दि. २६ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम. हे सहभागी झाले. आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने महाविद्यालयाचे विद्यार्थी / स्वयंसेवकांसाठी दि. २८ ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित केलेल्या कार्यशाळेत महाविद्यालयाचे सोमीनाथ सहाने, राजू खरात, जयश्री वाघ व कु. दिपाली बोलकर हे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

**ब) समाजस्तरावरील उपक्रम:**

१) **शेती व्यवसायासंबंधी मार्गदर्शन:-**दि. १५ फेब्रुवारी २०२० रोजी दरेगाव (दरी), ता. फुलंब्री येथे शेती व्यवसाय संबंधीचे मार्गदर्शन सायंकाळी ७.०० ते ९.१५ या दरम्यान करण्यात आले. यावेळी डोंगरगाव (कवाड) येथील अनुभवी शेतकरी श्री. बाबासाहेब डकले यांनी "रेशीम शेती"या शेतीपूरक व्यवसायासंदर्भात मार्गदर्शन केले. गेल्या १४ वर्षांपासून ते स्वत: तर हा व्यवसाय करतातच, त्याचबरोबर गावातील अन्य शेतकऱ्यांनाही त्यांनी प्रवृत्त केले आहे. रेशीम शेतीसंदर्भात बोलताना ते म्हणाले की, यामध्ये तुतीची लागवड करीत असताना चांगल्या प्रकारचे बेणे व योग्य लागवड करावी. अळ्यांचे

संगोपन करतांना त्यांना वाढीच्या वेगवेगळ्या टप्प्यात योग्य तो पाला टाकावा. शेडचे बांधकाम करतांना पूर्व-पश्चिम बांधल्यास शेडमधील वातावरणाचे व्यवस्थापन करणे सोपे जाते. कोष तयार झाल्यावर त्याची विक्री करतांना सामुहिकपणे करावी, त्यामुळे चांगला दर मिळू शकेल. कर्नाटक राज्यातील बेंगलोर जवळील रामनगर येथे कोसल्याची मोठी बाजारपेठ आहे. त्या ठिकाणी प्रतवारी करुन कोष नेल्यास चांगला दर मिळतो. कोष कोढल्यानंतर शेड चांगल्या रीतीने स्वच्छ करावा. तसेच तुतीच्या झाडचे संगोपन करावे जेणेकरुन दुसरा लॉट लवकर घेता येतो. शेतीसंबंधी पूरक व्यवसाय या विषयावर श्री. जी. बी. खंडागळे (निवृत्त कृषी साहाय्यक) यांनी मार्गदर्शन केले.त्यांनी यावेळी मशरुम, शेळीपालन, दुग्धव्यवसाय इत्यादी व्यवसायासंदर्भात माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांबरोबरच फळझाडांची लागवड करावी, जेणेकरुन उत्पन्नात वाढ होईल असा सल्ला दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दरेगाव (दरी) चे पोलीस पाटील श्री. बाबुराव मालोदे होते. या कार्यक्रमाच्या प्रास्तविकात कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश सांगितला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. बाबासाहेब लहाने यांनी केले. पाहुण्यांचा परिचय श्री. अजय जाधव, सुविचार राहुल बनसोडे यांने सांगितला तर आभार श्री. अमोल डकले यांनी मानले. कार्यक्रमास दरेगाव (दरी) तील ४६ पुरुष व २० महिला हजर होत्या. कार्यक्रमास गावच्या सरपंच सौ. शोभाबाई बाजीराव मालोदे, श्री. धनाजी दुधे, श्री. नानाभाऊ मालोदे, श्री. मधुकर मालोदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

२) **आरोग्य तपासणी व योग शिबिर:-** दि.२१ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दरेगा (दरी), ता. फुलंब्री येथे आरोग्य तपासणी व योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. विजय काथार (वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय, फुलंब्री) हे होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दरेगाव (दरी) येथील ज्येष्ठ नागरिक श्री. शामराव मालोदे हे होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. विजय काथार म्हणाले की, योगाने व्यक्तीच्या मनाची ताकद वाढते. शरीर सुदृढ होते. सैरभैर झालेल्या मनाला स्थिर करण्यासाठी योग करणे गरजेचे आहे. व्यक्तीचे आरोग्य बिघडल्यास वैद्यकीय उपचाराने आपण त्याला ठिक करतो. तेव्हा रोग्याने निश्चितच वैद्यकीय सल्ला घ्यावा. परंतु नियमित योग केल्याने व्यक्तीचे शरीर, मन व आत्मा प्रसन्न राहील आणि व्यक्ती स्वस्थ होईल. अशाप्रकारे स्वस्थ व्यक्ती व समाज झाल्यास आरोग्य बिघडणार नाही व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्याची गरज भासणार नाही. आरोग्य शिबिराचे आयोजन करावे लागू नये यासाठी योग शिबिराचे आयोजन करणे गरजेचे आहे. या शिबिराच्या प्रास्तविकात कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी शिबिराच्या आयोजनामागची भुमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री. राजू खरात या स्वयंसेवकाने केले तर आभार श्री. सखाराम मालोदे यांनी मानले. यावेळी योग शिबिरात डॉ. विजय काथार यांनी सुक्ष्म व्यायाम घेतले ज्यात पायाचे व हाताचे सुक्ष्म व्यायाम घेतले तर उभ्या योगासनात ताडासन, वृक्षासन हे प्रकार घेतले. प्राणायाम,

कपालभाती व भस्त्रिका हे प्राणायाम घेतले. या प्राणायाम शिबिरात दरेगाव (दरी) तील जेष्ठ नागरिकांसहीत लहान मुलांनी सहभाग घेतला. योग शिबिरानंतर आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये डॉक्टरांनी या गावातील महिला, बालक व ज्येष्ठ नागरिक अशा ५५ रुग्णांची तपासणी केली. या आरोग्य तपासणी व योग शिबिरास दरेगा (दरी) च्या सरपंच सौ. शोभाताई बाजीराव मालोदे, पोलीस पाटील श्री. बाबुराव मालोदे, ग्रामपंचायत सदस्य श्री. पांडुरंग दादा मालोदे व पांडुरंग मारोती मालोदे, श्री. शामराव मालोदे, श्री. सखाराम मालोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री. विनोद तुपे, श्री. जयराम जाधव व स्वयंसेवक राजू खरात यांचे सहकार्य लाभले.

**क) विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा:**

१) **उद्‌घाटन सत्र:-** दि. २९ जानेवारी २०२० रोजी डॉ. संजय मून (संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग) यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, आजीवन शिक्षण विभागाच्या माध्यमातून विद्यार्थी व समाजाच्या समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याने मी का शिकतो? हे प्रथमत: स्वत:ला विचारावे. स्वत:मध्ये रोजगारक्षमता निर्माण होण्यासाठी आपण शिकत असतो. त्यामुळे पुस्तकी ज्ञानाबरोबरच विविध कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत असे मत त्यांनी मांडले. उद्‌घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले होते. शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्यगुण विकसित करण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षण व्यवस्था चांगली पाहिजे असे मत त्यांनी मांडले. या सत्रात सुरुवातीस प्रास्ताविकातून कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी कार्यशाळेमागची भुमिका सांगितली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महेश थोरात यांनी केले. प्रार्थना कु. हर्षदा खोंडे व कु. स्वाती ढोके यांनी म्हटली तर सुविचार कु. अश्विनी मालोदे हिने सांगितला.

२) **सत्र दुसरे : व्यक्तिमत्त्व विकास:-** दिनांक २९ जानेवारी २०२० रोजी "व्यक्तिमत्त्व विकास"या विषयावर दुसरे सत्र घेण्यात आले. या सत्रास डॉ. आनंद उबाळे (इंग्रजी विभाग, डॉ. बा. आं. म. वि. औ.बाद) हे प्रमुख मार्गदर्शक होते. तर प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. दुर्गेश फुलवाडे हे अध्यक्ष होते. यावेळी व्यक्तिमत्तव विकास या विषयावर बोलताना डॉ. आनंद उबाळे म्हणाले की, उद्योग जगताने व्यक्तिमत्त्व विकास ही संकल्पना विकसित केली. त्यासाठी वेगवेगळे क्लासेस सुद्धा निघाले आहेत. व्यक्ती स्वत:चे व्यक्तिमत्त्व टिकवण्यासाठी निसर्गाच्या विरुद्ध जात आहे. इतर प्राणी मात्र निसर्गाच्या विरुद्ध जात नाहीत. आपणास अधिक पगार मिळाल्यानेच आपण सुख जीवन जगणार आहेता का? याचा विचार करावा. जो व्यक्ती नवनिर्मिती करतो त्यातून त्याला आनंद मिळतो व त्यातुन तो सुखी जीवन जगू शकतो. व्यक्तीने समाजचे जीवन अधिक सुखी करणाऱ्या नवनिर्मितीसाठी प्रयत्न करावेत.

३) **सत्र तिसरे : लेखन व संभाषण कौशल्य:-** या कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या तिसऱ्या सत्रात "लेखन व संभाषण कौशल्य" या विषयावर डॉ. कैलास इंगळे यांनी मार्गदर्शन केले तर या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. अश्विन रांजणीकर होते. लेखन व संभाषण कौशलय आत्मसात असलेल्या व्यक्तीला अधिक संधी आहेत. संभाषणातून तो दुभाषकाचे काम करु शकतो. लेखन प्रक्रियेतून तो भाषांतरकार म्हणून काम करु शकतो. ज्याची निवेदनशैली चांगली असेल तो निवेदक म्हणून काम करु शकतो. परंतु या सर्वांसाठी गरज आहे ती स्वत:ला ओळखण्याची. आपल्यामधील गुणांचा विकास करण्याची. विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन व श्रवणातून आपले गुण विकसित करावेत, असे मत त्यांनी मांडले. या सत्राचे सुत्रसंचलन कु. मानसी पवार हिने केले तर आभार डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी मानले. या कार्यशाळेत पहिल्या दिवशी ७८ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

४) **सत्र चौथे (गुरुवार, ३० जानेवारी २०२०) : बँकींग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी:-** विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी "बँकींग व शासकीय क्षेत्रातील रोजगार संधी" या विषयावर प्रा. संतोष बोरडे (बोरडे करिअर ॲकॅडमी, औरंगाबाद) यांनी मार्गदर्शन केले तर सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. महेश थोरात (वाणिज्य विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) होते. यावेळी ते म्हणाले की, ग्रामीण भागातील युवकांमध्ये बँकींग परीक्षेबाबत भिती असल्याने ते पोलीस भरती, ग्रामसेवक यापुढे जाऊन विचार करु शकत नाहीत. परंतु बँकींग परीक्षा कोणत्याही शाखेतील विद्यार्थी देऊ शकतो. यावेळी त्यांनी बँकींग परीक्षेसाठी असलेल्या अभ्यासक्रम व त्यासाठी कोणती पुस्तके वाचायची यासंदर्भात माहिती दिली.

५) **सत्र पाचवे : उद्योजकीय गुणांचा विकास:-** दुसऱ्या दिवशी पाचव्या सत्रात "उद्योजकीय गुणांचा विकास" या विषयावर श्री. सुहास भोगे (सीईओ ॲण्ड डायरेक्टर, मेझरवेल टेक्नोव्हीजन प्रा. लि.) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांसमोर स्वत:चा उद्योजकीय क्षेत्रातील प्रगतीचा अहवाल डोळ्यांसमोर ठेवला. त्यांनी बजाजमध्ये विविध पदांवर केलेल्या कामाचे अनुभव सांगितले. परंतु एक दिवस आपली बुद्धी इतरांसाठी वापरण्याऐवजी स्वत:च्या विकासासाठी वापरण्याचे ठरवले. त्यातून ते गुणवत्ता तपासणी उद्योजकाकडे वळले. आज त्यांची वार्षिक उलाढाल ६ ते ७ कोटी रुपयांची आहे. त्यांच्या उद्योजकाने आज हेलीकॉप्टरच्या गुणवत्ता तपासणीपर्यंत वाटचाल केल्याचे त्यांनी सांगितले. भारत-जर्मन करारानुसार जर्मनीत एक महिना प्रशिक्षणासाठी भारतातून पाठवण्यात आलेल्या २० उद्योजकांमध्ये त्यांचा समावेश होता. उद्योग हा व्यक्तीच्या डोक्यात व पोटात पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन करावे, इंग्रजीमध्ये संवाद करावा, पुस्तकांचे वाचन करावे व स्वत:च्या शब्दांचा आदर करावा, असा सल्ला दिला. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले तर आभार डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी मानले.

६) **समोरप सत्र : करिअर मार्गदर्शन:-** कार्यशाळेच्या समारोप सत्रात "करिअर मार्गदर्शन" या विषयावर श्री. गजानन हरकळ (सहशिक्षक, स्वामी विवेकानंद विद्यालय, चित्तेपिंपळगाव) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. विजय पांडे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. करिअर मार्गदर्शन या विषयावर मार्गदर्शन करतांना श्री. गजानन हरकळ यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या विविध पदांच्या बाबतीत, अभ्यासक्रमाच्या बाबतीत माहिती दिली व त्यासाठी विविध पातळ्यावरील परीक्षांच्या तयारीबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयात पदवीसाठी प्रवेश घेतल्यापासूनच विद्यार्थ्यांनी कोणत्या पदासाठी आपण तयारी करायची हे ठरवावे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन कु. मानसी पवार हिने केले तर आभार अमोल डकले या स्वयंसेवकाने मानले. कार्यशाळेत दुसऱ्या दिवशी ७५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

**ड) स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अभ्याक्रम (Self Finance Certificate Courses)**

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद महाविद्यालयास मंजूर केलेल्या अभ्यासक्रमांपैकी विक्री प्रतिनिधी या अभ्यासक्रमास ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला.या अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून महाविद्यालयाच्या वाणिज्य शाखेचे डॉ.महेश थोरात व प्रा.नितिन माळेगावकर यांनी काम पाहिले.

## परीक्षा विभाग

१) **उद्‌बोधन वर्ग:-** महाविद्यालयातील बी. ए. बी. कॉम व बी. एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि.२८/०८/२०१९ रोजी उद्‌बोधन वर्ग घेण्यात आला. याप्रसंगी परीक्षा विभागाच्या वतीने शैक्षणिक सत्राचे वेळापत्रक व परीक्षांचा अंदाजे कालावधी याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. याबरोबरच कॉपीमुक्त परीक्षा महाविद्यालयात घेतल्या जातात. अभ्यास करुन विद्यार्थ्यांनी परीक्षेला सामोरे जावे असे अवाहन करण्यात आले.

२) **विद्यापीठ परीक्षा ऑक्टो / नोव्हें-२०१९:-** बी. ए., बी. कॉम व बी. एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या ऑक्टो/नोव्हें-२०१९ या सत्र परीक्षा दि. १०/१०/२०१९ ते ३१/१०/२०१९ या कालावधीत संपन्न झाल्या. तसेच एम. कॉम प्रथम वर्षाच्या परीक्षा दि. १९/११/२०१९ ते २२/११/२०१९ या कालावधीत संपन्न झाल्या.

३) **वर्ग चाचणी परीक्षा:-** महाविद्यालयात अंतर्गत मुल्यमापन करण्यासंबंधी चर्चा दि. ०८/०१/२०२० रोजी IQAC मिटींग मध्ये झाली. त्यानुसार वर्ग चाचणी वेळापत्रक दि. १३/०१/२०२० रोजी फलकावर लावण्यात आले. त्यानुसार बी. ए., प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची वर्ग चाचणी परीक्षा दि. ०३/०२/२०२० रोजी घेतली. बी. एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची वर्ग चाचणी परीक्षा दि. ०४/०२/२०२० रोजी घेतली. तसेच बी. कॉम प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाची वर्ग चाचणी परीक्षा दि. ०५/०२/२०२० रोजी

घेण्यात आली. वर्ग चाचणीच्या उत्तरपत्रिका दि. ०७ व ०८/०२/२०२० रोजी संबंधित विषय शिक्षकाकडे सुपुर्द केल्या.

**४) परीक्षाचे निकाल:-** मागील वर्षातील ऑक्टो/नोव्हें २०१८ व मार्च/एप्रिल २०१९ या परीक्षांचे निकाल दि. ०२/१२/२०१९ व ०३/१२/२०१९ रोजी काढले.

**विद्याशाखानिहाय निकाल खालीलप्रमाणे आहेत.**

| अ.क्र. | वर्ग | ऑक्टो-२०१८ | मार्च-२०१९ |
|---|---|---|---|
| १) | बी. ए. प्रथम वर्ष | ९.६२% | १८.२९% |
| २) | बी. ए. द्वितीय वर्ष | ५७.१४% | २३.३३% |
| ३) | बी. ए. तृतीय वर्ष | २५.९२% | २६.९२% |
| ४) | बी. कॉम प्रथम वर्ष | २२.२२% | ४.९१% |
| ५) | बी. कॉम द्वितीय वर्ष | ५३.३३% | ४४.२३% |
| ६) | बी. कॉम तृतीय वर्ष | ४१.३४% | ४७.८२% |
| ७) | बी. एस्सी प्रथम | १७.६४% | २९.५२% |
| ८) | बी. एस्सी द्वितीय | ४९.३५% | १८.१८% |

**५) पदवी प्रमाणपत्रे प्राप्त केली:-**मागील शैक्षणिक वर्षातील बी. ए. व बी. कॉम तृतीय वर्षाच्या ऑक्टो/नोव्हें २०१८ व मार्च/एप्रिल २०१९ परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांची पदवी प्रमाणपत्रे दि. ०६ मार्च २०२० रोजी विद्यापीठातून आणले.

**६) मार्च/एप्रिल २०२० परीक्षेची तयारी:-** विद्यापीठ परीक्षा मार्च/एप्रिल २०२० या दि. १७/०३/२०२० ते ११/०४/२०२० या कालावधीत घेण्याचे ठरले होते. परंतु विद्यापीठाच्या परीपत्रकानुसार परीक्षा रद्द करण्यात आल्या.

## प्रसिद्धी विभाग

महाविद्यालयात समाजपूरक, ज्ञानपूरक, तसेच शैक्षणिक विषयांना अनुसरून आयोजित केलेल्या उपक्रमांची माहिती समाजापर्यंत पोहंचावी, दृष्ठा समाज बनावा त्याचबरोबर समाजात चालू असलेल्या घडामोडींचे ज्ञान जनमानसाला व्हावे, समाज चांगल्या दिशेला घेवून जाणे हा प्रांजळ प्रयत्न प्रसिद्धी विभागाचा आहे. म्हणून वर्षभरात आयोजिलेल्या कार्यक्रमांना खालीलप्रमाणे प्रसिद्ध देण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षात विविध अशा वृत्तपत्रांमधून महाविद्यालयातील कार्यक्रमांना प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न केला आहे.शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये विविध विभाग व समित्यांचे ४० ते ४५ कार्यक्रम संपन्न झाले.योग दिन, दरेगांव दरी येथे वृक्षारोपन, अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक

पुण्यतिथी, गुणवंत विद्यार्थी सत्कार, उद्‌बोधन वर्ग, महाआरोग्य शिबीर/मा. बागडे नाना वाढदिवस, मॅरेथॉन स्पर्धा, स्वातंत्र्य दिन व्याख्यान, आजीवन शिक्षण विभाग, विद्यापीठ वर्धापन दिन, सामाजिकशास्त्र अभ्यासमंडळ उद्‌घाटन, महिला तक्रार निवारण समिती व्याख्यान, वाणिज्य मंडळ उद्‌घाटन, विद्यापीठ स्तरीय काव्यवाचन व भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन, पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती, नेहरू युवा केंद्र औरंगाबाद, भाषण स्पर्धा, राष्ट्रीय सेवा योजना शिबीर, मा. बागडे नाना उपस्थिती, पाणी पुरवठा व स्वच्छतामित्र वक्तृत्व करंडक स्पर्धा, महात्मा गांधी व्याख्यानमाला, आजीवन शिक्षण विभाग कार्यशाळा, वस्तू आणि सेवाकर कार्यशाळा, शिवजयंती निमित्त तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा, बहुभाषिक संमेलन, मराठी भाषा गौरव दिन, इत्यादी या सर्व कार्यक्रमांना प्रसिद्धी देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२७ कार्यक्रमांच्या २२ बातम्या विविध वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झाल्या आहेत.त्यात सर्वाधिक ०६ बातम्या सकाळ या वर्तमानपत्राने दिल्या.तर दै.पुढारी ०४, दै.सांजवार्ता ०४, दै.पुण्यनगरी ०३, दिव्यमराठी ०१, फुलंब्री टाईम्स ०१, दै.लोकमत ०१, दै.लोकमत समाचार ०१, दै.सामना ०१ या प्रकारे प्रसिद्धी मिळाली.

## सांस्कृतिक विभाग

१) **दिनांक २६ जून २०१९:-** रोजी शाहू महाराज जयंती पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

२) **दिनांक ०१ जुलै २०१९:-** रोजी वसंतराव नाईक यांचा जन्मदिन कृषिदिन म्हणून साजरा करण्यात आला.

३) **दिनांक १६ जुलै २०१९:-** रोजी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यानिमित्ताने डॉ. दत्तात्रय येडले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

४) **दिनांक ३१ जुलै २०१९:-** रोजी सावता महाराज पुण्यतिथी साजरी करण्यात आली. प्रा. डॉ. गोविंद बोरसे (शिवाजी महाविद्यालय, कन्नड) यांनी "मराठी संतांचे कार्य व प्रेरणा" या विषयावर व्याख्यान दिले.

५) **दिनांक ०१ ऑगस्ट २०१९:-** रोजी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. नितीन माळेगावकर यांनी दोन्ही महात्म्यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.

६) **दिनांक १३ ऑगस्ट २०१९:-** रोजी संस्थापक अध्यक्ष कै. रावसाहेब दांडगे यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ. पांडुरंग कल्याणकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी संस्थेचे वेगळेपण उलगडून दाखविले.

७) **दिनांक १५ ऑगस्ट २०१९:-** रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रा. बाबासाहेब लहाने यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

८) **दिनांक ०७ सप्टेंबर २०१९:-** रोजी राजे उमाजी नाईक जयंती साजरी करण्यात आली. या वेळी डॉ. दत्तात्रय येडले यांनी उमाजी नाईक यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला.

९) **दिनांक १५ ऑक्टोबर २०१९:-** रोजी भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी ग्रंथलयामध्ये पुस्तक प्रदर्शन ठेवण्यात आले होते. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट दिली.

१०) **दिनांक २४ ऑक्टोबर २०१९:-** महर्षि वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली.

११) **दिनांक १४ नोव्हेंबर २०१९:-**रोजी पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली.

१२) **दिनांक १५ नोव्हेंबर २०१९:-** रोजी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

१३) **दिनांक १९ नोव्हेंबर २०१९:-** रोजी  इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

१४) **दिनांक २६ नोव्हेंबर २०१९:-** रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. रामकिशन लोमटे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशपत्रिकेचे वाचन केले. यानिमित्ताने वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेचे विषय- १) दीडजिबी डाटा - फायदा की तोटा, २) शेतकऱ्यांच्या आत्महत्या, ३) आजची शिक्षण पद्धती इत्यादी. विजेते- १) प्रथम, जगधने संदीप, द्वितीय, डकले अमोल.

१५) **दिनांक २६ डिसेंबर २०१९:-** रोजी देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत कु. मानसी पवार ह्या विद्यार्थीनीने सहभाग नोंदविला.

१६) **दिनांक १२ जानेवारी २०२०:-** रोजी स्वामी विवेकानंद जयंती व मातोश्री जिजाऊ जयंती पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली.

१७) **दिनांक १४ जानेवारी २०२०:-** रोजी नामविस्तार दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी श्री. विजय गवळी (प्रख्यात वक्ते) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी उपस्थितांसमोर नामविस्ताराचा इतिहास ठेवला.

१८) **दिनांक २२ जानेवारी २०१९:-** सुभाषचंद्र बोस यांची जयंती पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली

१९) **दिनांक १५ फेब्रुवारी २०२०:-** रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

२०) **दिनांक १९ फेब्रुवारी २०२०:-** रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

२१) **दिनांक २३ फेब्रुवारी २०२०:-** रोजी संत गाडगे बाबा महाराज यांची जयंती पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली.

२२) **दिनांक १२ मार्च २०२०:-** रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला हार घालून जयंती साजरी करण्यात आली.

२३) **दिनांक २३ मार्च २०२०:-** रोजी शहीद दिन साजरा करण्यात आला.

२४) **दिनांक ११ एप्रिल २०२०:-** रोजी महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

२५) **दिनांक १४ एप्रिल २०२०:-** रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती पुष्पहार अर्पण करुन साजरी करण्यात आली.

२६) **दिनांक १८ एप्रिल २०२०:-** रोजी महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली.

२७) **दिनांक ३० एप्रिल २०२०:-** रोजी संत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

२८) **दिनांक २१ ते २४ नोव्हेंबर २०१९, केंद्रिय युवक महोत्सव :-** या दरम्यान विद्यापीठात केंद्रिय युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या युवा महोत्सवात महाविद्यालयातील संघ सहभागी झाला होता. एकुण १८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. एकूण २२ कला प्रकारामध्ये कलावंत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

२९) **दिनांक २४ जानेवारी २०२०, वार्षिक स्नेहसंमेलनात संगीत रजनी :-** रोजी महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनात संगीत रजनी अंतर्गत विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रम सादर करण्यात आला. त्यात गणेश वंदन, लावणी, समुहनृत्य सादर करण्यात आले.

## शिक्षक पालक संघ

१) **शिक्षक पालक संघ समिती स्थापना:-** महाविद्यालयामध्ये अगोदर अस्तित्वात असलेल्या शिक्षक पालक संघातील काही प्राध्यापक प्रतिनिधी व विद्यार्थी महाविद्यालयातून इतर ठिकाणी गेल्यामुळे पुर्वीची अस्तित्वात असलेली शिक्षक पालक संघ समिती बरखास्त करुन त्याऐवजी नवीन शिक्षक पालक संघाची स्थापना दि. ०४/१०/२०१९ रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या बैठकीत करण्यात आली.

२) **पालक व प्राचार्य यांची समन्वय बैठक:-** महाविद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या बी. ए., बी. कॉम., व बी. एस्सी च्या सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांना बोलावून त्यांचा एक पालक मेळावा करण्यासंदर्भात विचार विनिमय करण्यासाठी काही प्रतिनिधिक पालक व शिक्षक पालक संघ समितीचे सर्व सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये व मा. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० डिसेंबर २०१९, मंगळवार रोजी एका व्यापक बैठकीचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्यांनी सर्व पालकांस

महाविद्यालयातील उपक्रमांविषयी माहिती दिली व पुढील मेळावा यशस्वी करण्यासंदर्भात सूचना केल्या व या बैठकीस सर्व शिक्षक प्रतिनिधी व ७ पालकांची उपस्थिती होती.

३) **शिक्षक पालक संघ समन्वय बैठक:-** महाविद्यालयामध्ये दिनांक १७ फेब्रुवारी २०२० रोजी पालक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी पालक बैठकीच्या पूर्वी उपस्थित पालक प्रतिनिधी व शिक्षक प्रतिनिधी उपस्थिती होती. ही बैठक सकाळी १०.३० ते ११.३० च्या दरम्यान संपन्न झाली. या बैठकीत प्राचार्यांनी विद्यार्थ्यांची अल्प उपस्थिती याकडे पालकांचे लक्ष वेधले.

४) **विद्यार्थी व पालक यांच्यासाठी व्याख्यानाचे आयोजन:-** महाविद्यालयामध्ये दिनांक १७ फेब्रुवारी २०२० रोजी सकाळी ११.३० वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिकेत IQAC चे संयोजक डॉ. अश्विन रांजणीकर यांच्या मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. रांजणीकर यांनी महाविद्यालयीन उच्च शिक्षणाचा हेतू व त्यामध्ये विद्यार्थी व पालक यांची भूमिका काय असावी या अनुषंगाने आपले विचार मांडले. त्यांनी मार्गदर्शनात महाविद्यालयातील शैक्षणिक सुविधांचा पुरेपुर वापर विद्यार्थ्यांनी करुन घेतला पाहिजे व त्यासाठी पालकांनीही आपल्या पाल्य नियमित प्रोत्साहीत केले पाहिजे. आपला पाल्य काय करतो याकडे सर्व पालकांनी आवर्जुन वैयक्तिक लक्ष्य दिले पाहिजे असे मत त्यांनी मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक समिती प्रमुख डॉ. सुरेश मुंढे यांनी केले तर कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. याप्रसंगी काही निवडक पालकांनी ही आपले मनोगत व्यक्त केले. त्यामध्ये मोरेश्वर डांगे व कडुबा चंद्रे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे आभार डॉ. रामकिशन लोमटे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी पालक, प्राध्यापक व महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

## आचार्यकुल प्रबोधिनी

५) **सहविचार सभा:-** प्रतिवर्षाप्रमाणे पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था अंतर्गत आचार्यकुल प्रबोधिनिच्या वतीने आयोजित करण्यात येणारी सहविचार सभा शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील दिनांक २ ते ४ ऑगस्ट २०१९ दरम्यान संत भगवानबाबा प्राथमिक आश्रमशाळा, आन्वी, ता. बदनापूर, जि. जालना येथे निवासी संपन्न झाली.

६) **दि. ०२ ऑगस्ट २०१९:-** रोजी संस्थेमधील सर्व प्राध्यापक शिक्षक, कर्मचारी बैठकीच्या ठिकाणी रात्री ७.०० वा. पर्यंत उपस्थित झाले. यानंतर संध्याकाळी ७.३० ते ८.३० च्या दरम्यान संस्थेची सैद्धांतिक भूमिका या विषयावर मा. श्री. शामसुंदर नाईक संस्थेचे सचिव यांनी आपले विचार मांडले.

७) **दि. ०३ ऑगस्ट २०१९:-** रोजी सकाळी खेळ व प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर १० ते ११.३० या वेळेत ग्रामविकासासाठी शिक्षण या विषयावर श्री. चेतराम पवार यांनी मार्गदर्शन केले तर दुपारच्या १२ ते १

दरम्यानच्या सत्रात डॉ. संजिव सावजी यांनी विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र या विषयावर आपले विचार मांडले. दुपारी भोजनानंतर संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. हरिभाऊजी बागडे (नाना) यांनी सर्व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. सायंकाळी ७.३० ते ८.४५ दरम्यान संगीत व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला.

८) **दि. ०४ ऑगस्ट २०१९:-** रोजी सकाळी खेळ व प्रार्थना घेण्यात आली. त्यानंतर १० ते १२ दरम्यान परिसर व शाळा विकास या विषयांवर श्री. मुरमे कृष्णा यांनी विषय मांडणी केली. त्यानंतर विषयनिहाय गटचर्चा घेण्यात आल्या व दुपारी भोजनानंतर २.३० ते ४.०० दरम्यान समारोपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष श्री. देवजीभाई पटेल, सचिव श्री. शामरावजी नाईक व विश्वस्त डॉ. सर्जेराव ठोंबरे हे उपस्थित होते.

९) **अभ्यास सहल:-** प्रतिवर्षाप्रमाणे आर्चायकुल प्रबोधिनीच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१९-२० ची कर्मचाऱ्यांची अभ्यास सहल दि. ३० नोव्हेंबर २०१९ रोजी लोणार सरोवर व सिंदखेड राजा या ठिकाणी नेण्यात आली.

**१०) शोधनिबंध वाचन:-**

१. डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी दिनांक १६/०८/२०१९ रोजी किमान आधारभूत किमतीबाबत शेतकऱ्यांची जागरुकता या विषयावर आपल्या शोधनिबंधाचे पी.पी.टी. च्या माध्यमातून सादरीकरण केले. याप्रसंगी ८ प्राध्यापकांची उपस्थिती होती.

२. डॉ. राजश्री पवार यांनी दिनांक ३०/०८/२०१९ रोजी निसर्गदत्त महाराजांची आध्यात्मिक शिकवन या विषयाच्या अनुषंगाने आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. याप्रसंगी ८ प्राध्यापक व २ विद्यार्थी उपस्थित होते.

३. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी दिनांक १३/०९/२०१९ रोजी फुलंब्री तालुक्यातील विहिर अनुदान योजनेचे मुल्यमापन या विषयावर अभ्यास या विषयावर आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. याप्रसंगी ८ प्राध्यापकव ३ विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

४. डॉ. रामकिशन लोमटे यांनी दिनांक ०७/१०/२०१९ रोजी महात्मा गांधीचे शाश्वत विकासाचे विचार या विषयावर आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. याप्रसंगी ९ प्राध्यापकांची उपस्थिती होती.

५. डॉ. अश्विन रांजणीकर व डॉ. दत्तात्रय येडले यांनी दिनांक १८/१२/२०१९ रोजी नागरीकता संशोधन अधिनियम २०१९ या विषयांवर आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण पी.पी.टी. द्वारे केले. याप्रसंगी ९ प्राध्यापकांची उपस्थिती होती.

६. डॉ. संजिवकुमार पांचाळ यांनी दिनांक १८/०१/२०२० रोजी लोकसाहित्य काल, आज आणि उद्या या विषयावर आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. याप्रसंगी ७ प्राध्यापक उपस्थित होते.

७. डॉ. महेश थोरात यांनी दिनांक १५/०२/२०२० रोजी महाराष्ट्र राज्यातील पायाभुत सुविधांमधील विजेची उपलब्धता एक अभ्यास या विषयावर आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. याप्रसंगी ६ प्राध्यापकांची उपस्थिती होती.

८. प्रा. विजय पांडे, डॉ. संदीप जगताप व प्रा. नितीन माळेगावकर यांनी दिनांक ०३/०३/२०२० रोजी आपल्या शोधनिबंधाचे सादरीकरण केले. याप्रसंगी प्रा. विजय पांडे यांनी शिवकालीन राजनितीचा उत्तर दक्षिण राजकारणातील प्रभाव व डॉ. संदीप जगताप यांनी भारतीय खेळ तर प्रा. नितीन माळेगावकर यांनी बुक रिव्ह्युचे वाचन केले. यावेळी ९ प्राध्यापक उपस्थित होते.

**११) सत्कार समारंभ:-**

१. प्रा. डॉ. सुरेश माधवराव मुंढे यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या परीक्षा विभागाच्या ४८(३) क सदस्य पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे स्वागत महाविद्यालयामार्फत करण्यात आले.

**१२) पंडित दीनदयाळ शिष्यवृत्ती योजना:-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून महाविद्यालयातील नियमित उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आचार्यकुल प्रबोधिनीच्या वतीने पंडित दीनदयाळ शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली. यामध्ये बी. ए, बी.कॉम, बी.एस्सी व क्रीडा, सांस्कृतिक, रा.से.यो. च्या नियमित उपस्थित राहणाऱ्या एकूण ३५ विद्यार्थी व विद्यार्थीनींची निवड करुन मुले व मुलींना प्रत्येकी १०००/- प्रमाणे एकूण ३५०००/- ची आर्थिक मदत करण्यात आली.

**१३) विद्यार्थीनींना मोफत गणवेश वाटप:-** महाविद्यालयामध्ये दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजी मा. श्री. चंद्रकांत दादा यांच्या वाढदिवसानिमित्त दादाची ताईला भेट या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील २०७ विद्यार्थीनींना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमासाठी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. योगिता होके पाटील (सिनेट सदस्या, डॉ. बा. आं. म. वि. औ.बाद) होत्या तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुरेश मुंढे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन आचार्यकुल प्रबोधिनीच्या वतीने करण्यात आले होते.

## क्रांतीगुरू लहुजी सावळे संस्कार केंद्र

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयाच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या लहुजी साळवे बाल संस्कार केंद्राचे मासिक वेळापत्रक तयार करुन लावण्यात आले. महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी नेमून दिलेल्या दिवशी संस्कार केंद्रावर जावून अध्यापनाचे कार्य केले आहे. तसेच वर्षभरात बाल संस्कार केंद्रात पुढील कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

१) **बाल आरोग्य तपासणी शिबिर:-** लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील आणि परिसरातील लहान बालकांसाठी दि. १४ सप्टेंबर २०१९ रोजी बाल आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदरील शिबिरासाठी फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. सिकंदर शेख आणि सिस्टर अनिता भालेराव आल्या होत्या. डॉक्टरांनी लहान बालकांच्या मतांशी संवाद साधला. मुलांचा आहर कसा असावा व त्यांच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. मातांच्या मनात असलेले प्रश्न व शंका यांचे निरसन केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी देखील मातांशी संवाद साधला आणि मुलांना ब्रेड, बिस्कीट, चिप्स, कुरकुरे इ. पदार्थ खायला देऊ नका असे आवाहन केले. अंगणवाडी सेविका शाहीन पटेल यांनी मातांनी कोणता पुरक पोषक आहार घ्यावा याविषयी माहिती दिली. तसेच पोषक आहारातील विविध भाज्या, फळे व डाळींचे प्रदर्शन मांडले होते. सदरील शिबिरात ४८ बालकांची तपासणी झाली. ज्यात मुलांमध्ये पोटदुखी, दात दुखी, त्वचा विकार आणि योग्य शारीरिक वाढ न होणे आदी समस्या दिसून आल्या.

२) **बालदिन कार्यक्रम:-** लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रात दिनांक १४ नोव्हेंबर २०१९ रोजी पंडित जवाहरलाल नेहरु व लहुजी साळवे यांच्या जयंती निमित्त बाल दिन साजर करण्यात आला. संस्कार केंद्रातील बालकांनी विविध गुण दर्शनांचा कार्यक्रम सादर केला. काही मुलांनी गाणी म्हटली, काहींनी कथा सांगितली काहीजण राजकारणी व समाजसुधारक बनून विचार व्यक्त केले.

३) **खेळाच्या स्पर्धा:-** लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील लहान व मोठ्या मुलांसाठी खेळाच्या स्पर्धा दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजी घेण्यात आल्या. ज्यात धावणे, लंगडी, लिंबू चमचा व संगित खुर्ची या खेळांचा समावेश होता. खेळाच्या स्पर्धेत १६ मुलांनी सहभाग घेतला होता.

४) **वार्षिक स्नेहसंमेलन:-** लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील मुलांसाठी दिनांक २२ फेब्रुवारी २०२० रोजी वार्षिक स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्नेह संमेलनात तेरा गाण्यांवर १३ विद्यार्थ्यांनी नृत्य केले. सहभागी विद्यार्थी ऋषिकेश तुपे, धनश्री कांबळे, रागिनी तुपे, राखी भालेराव, सलोनी तुपे, प्रणाली तुपे, उज्ज्वला तुपे, यश तुपे, दत्तु शेजवळ, दिव्या भारद्वाज, साक्षी भारद्वाज, वैष्णवी भालेराव, पायल तुपे.

५) **प्राध्यापकांनी घेतलेल्या तासिका:-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांनी संस्कार केंद्रात जाऊन तासिका घेतल्या. नेमुन दिलेल्या तासिकापैकी घेतलेल्या तासिकांचा तपशिल डॉ. पांडुरंग कल्याणकर १० (११), डॉ. राजश्री पवार ०९ (०५), डॉ. मंजुषा नळगीरकर १० (१०), प्रा. विजय पांडे १० (०८), डॉ. रामकिशन लोमटे १० (०५), डॉ. दत्तात्रय येडले १० (०६), डॉ. सुरेश मुंढे १० (०७), डॉ. संजिवकुमार पांचाळ ०८ (०७), डॉ. अश्विन रांजणकर ०८ (०३), डॉ. महेश थोरात ०९ (०३), प्रा. नितीन माळेगावकर ०७ (०४), डॉ. संदीप जगताप ०९ (०२)

## कै. आ. वसंतराव काळे स्वाभिमान शिक्षण योजना "कमवा व शिका"

१) **कामकाजाचे स्वरूप:-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादने महाविद्यालयास या योजनेस मंजूरी दिली नसल्यामुळे महाविद्यालय स्तरावर ही योजना सुरु ठेवावी यासंदर्भात मा. प्राचार्यांनी सांगितल्यामुळे या शैक्षणिक वर्षात फक्त ४ मुले या योजनेसाठी निवड करण्यात आले व ही योजना डिसेंबर २०१९ ते मार्च २०२० या कालावधीत मध्ये राबविण्यात आली.

२) **योजनेचा कालावधी:-** माहे डिसेंबर २०१९ ते मार्च २०२०

३) **कामाची वेळ:-** दुपारी ३ ते ५, रविवार वगळता

४) **प्रतिमहिना मानधन :-**प्रति महिना ३०० रु.

५) **विद्यार्थी संख्या:-** २ मुले व २ मुली

६) **कामाचे स्वरुप:-** गांडुळखत निर्मिती, परिसर स्वच्छता, कोरफड प्रकल्प निगराणी

## प्रवेश समिती

१) **माहिती पुस्तिका छपाई :-** प्रवेश समितीकडून ३० एप्रिल २०१९ रोजी सर्व विभागांचे वार्षिक नियोजन तयार करुन त्यांचे एकत्रिकरण करण्यात आले व ते मे महिण्यामध्ये छपाईसाठी देण्यात आले. १ जून २०१९ रोजी माहिती पुस्तकांची छपाई करण्यात आली. एकूण ५०० माहिती माहितीपुस्तिका छापण्यात आल्या.

२) **प्रवेशसाठी समित्यांची स्थापना:-** १५ जून रोजी महाविद्यालयाची सुरूवात झाली. त्यानुसार प्रवेशासंबंधीच्या जबाबदारीचे वाटप करण्यात आले. वार्षिक नियोजन, समित्या स्थापन फोटोसह, विविध प्रवर्गासाठी व वर्गासाठी असणाऱ्या शुल्क यांच्या प्रत्येक एक-एक प्रत महाविद्यालयातील सूचनाफलकावर लावण्यात आल्या.

३) **कनिष्ठ महाविद्यालयांना भेटी:-** १५ जून २०१९ रोजी प्राचार्यांच्या अध्यक्षेतखाली बैठक घेऊन त्यानुसार परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांना प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी समुपदेशनासाठी भेटी दिल्या. प्रत्यक्ष भेटीतून विद्यार्थ्यांना महाविद्यालचे वैशिष्ट्ये सांगण्यात आले. विद्यार्थ्यांचे नाव, मोबाईल क्रमांक, वर्ग इत्यादी माहिती संकलित करुन त्यांना महाविद्यालयाचे माहिती पत्रक देण्यात आले व त्या त्या गावातील महत्त्वाच्या ठिकाणी बॅनर लावण्यात आले.

४) **वेळापत्रक:-** दि. १ जुलै २०१९ रोजी महाविद्यालयाचे वेळापत्रक बनविण्यात आले. यात विषय, वर्गखोली, प्राध्यापकांचे नाव यानुसार वेळापत्रकाची एक-एक प्रत सर्वांना देण्यात आली व त्यानुसार त्या त्या विभागाचे विभाग प्रमुख व सहाय्यकांच्या वेळापत्रकाची एक-एक प्रत समितीकडे जमा करुण घेण्यात आली.

**५) विद्यार्थी प्रवेशित संख्या:-** प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची शाखा व वर्गनिहाय संख्या (२०१९-२०)

| वर्ग | बी. ए. | | | बी. कॉम. | | | बी. एस्सी. | | | एम. कॉम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | मुले | मुली | एकूण | एकूण |
| प्रथम वर्ष | ५७ | ४९ | १०६ | ३१ | २३ | ५४ | २८ | ४३ | ७१ | ३९ |
| द्वितीय वर्ष | २८ | २५ | ५३ | ४२ | २३ | ६५ | ४० | ४० | ८० | - |
| तृतीय वर्ष | ३५ | २३ | ५४ | १८ | १७ | ३५ | २९ | २४ | ५३ | - |
| एकूण | १२० | ९७ | २१३ | ९१ | ६३ | १५४ | ९७ | १०७ | २०४ | ३९ |

## संशोधन समिती

महाविद्यालयात प्राध्यापकांमध्ये संशोधक वृत्ती वृद्धींगत करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या संशोधन समितीमार्फत शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये कार्यक्रम घेण्यात आले.

१) **बैठका:-** संशोधन समितीच्या वर्षभरात दोन बैठका घेण्यात आल्या. (दि. १४ ऑगस्ट २०१९ व दि. ०९ डिसेंबर २०१९). सदरील बैठकीत लघु व बृहद संशोधन प्रकल्प तसेच कार्यशाळा, चर्चासत्र, परिषदा आयोजनासाठीचे प्रस्ताव तयार करण्याबाबत चर्चा झाली. प्रत्येक विभागाने क्षेत्र सर्वेक्षण करावे तसेच अन्य संस्थाशी सामंजस्य करार करावेत, यासाठी सूचनाही देण्यात आल्या. तसेच फुलंब्री तालुक्यातील शासकीय विहीर योजना लाभार्थी सर्वेक्षणासंबंधी चर्चा होऊन सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले.

२) **संशोधन कार्यशाळा:-** दिनांक २७ ऑगस्ट २०१९ रोजी प्रस्तुत महाविद्यालय आणि राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री यांच्या संयुक्त विद्यमाने UGC STRIDE SCHEME या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. महेंद्र शिरसाठ (विभाग प्रमुख, पदार्थ विज्ञान विभाग, डॉ. बा. आं. म. वि. औ. बाद) हे लाभले होते. यु. जी. सी. ने घोषित केलेल्या STRIDE SCHME विषयी सविस्तर माहिती दिली. STRIDE SCHEME अंतर्गत लघु व बहद संशोधन प्रकल्प कसे करावेत. कॉम्पोनंन्ट वन व कॉम्पोनंन्ट टु अंतर्गत महाविद्यालय व प्राध्यापक यांनी कसे प्रस्ताव टाकावेत या विषयी चर्चा केली. कार्यशाळेचे अध्यक्षस्थान डॉ. संतोष जाधव (प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री) यांनी भूषविले. सदरील कार्यशाळेस ३४ जणांनी सहभाग घेतला.

३) **सर्वेक्षण अहवाल:-** महाविद्यालयात दिनांक ००/००/२०२० रोजी फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी भूजल व्यवस्थापन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेस "फुलंब्री तालुक्यातील शासकीय विहीर अनुदान योजना लाभार्थी सर्वेक्षण" अहवाल प्रकाशित करण्यात आला.

४) **तज्ञ व्याख्यान:-** संशोधन समितीच्या वतीने दिनांक १४ फेब्रुवारी २०२० रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानास व्याख्याते म्हणून डॉ. एस. एल. पद्मे (सहाय्यक ग्रंथपाल, डॉ. बा. आं. म. वि. औ. बाद) हे लाभले होते. त्यांनी "संशोधन प्रकाशन" या विषयावर प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. प्राध्यापकांनी आपले संशोधन साहित्य UGC च्या प्रकाशन विषयक नवीन नियमानुसार UGC core listed journal, H Index, Googal scholay, sitetion index, Impact factor आदी संकल्पना स्पष्ट करुन प्राध्यापकांच्या मनात निर्माण झालेल्या शंकांचे निरसन केले. सदरील व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

## Career Guidance and Placement Cell

1) **Career Guidance in Computer Education**:- On 29th August 2019 Career guidance and Placement Cell conducted the Guest Lecture of Mr.Yogesh Dutonde and Mr.Anand Shelke (Director- Basic Multiservice Phulambri. He guided the students on the topic of 'Career Guidance in Computer Education'.
2) **Skill Development** :- On 30th September 2019 Career Guidance and Placement Cell conducted the Guest Lecture of Mr.Sanjay Deshpande ( Senior Manager- EduBridge Learning Pvt. Ltd. Aurangabad) and Mr Ayazuddin Shaikh (Manager- Projects- EduBridge Learning Pvt. Ltd. Aurangabad). Mr Ayazuddin Shaikh guided the students on the topic of च्Skill Developmentछ. In this lecture he explain lots of opportunities available to the skilled man, he brief explain about communication skill, personality development, accounting work, banking etc. For this lecture the students of B.Com. and B. A. were present
3) **Career in Management**:- On 5th February 2020 Career Guidance and Placement Cell conducted the seminar of Dr. Pravin Kumar Shastri ( HOD-MBA- Shreeyash College of MBA Aurangabad) who guided to students on Career on Management. Sir guided to students on different career opportunity available in the field Management i.e. MBA. While explaining it in brief, Sir has given it sector wise

like Banking, Insurance, Human Resource, Finance, Marketing Management, Production, etc.

4) **Personality Development**:- On 5th February 2020 Career Guidance and Placement Cell conducted the seminar of Prof. Saad Siddiqui (Asst. Prof.- Shreeyash College of Engineering and Technology Aurangabad) on the topic 'Personality Development'. In this seminar Sir has given some tips of Personality Development to students.

5) **Campus Interview**:- On 2nd January 2020 an Campus Interview has been held in Career Guidance and Placement Cell by ITM- Institute for Technology and Management on behalf of ICICI Bank LTD. Mr. Devesh Yadav Branch Manager, CSBB ICICI Bank and Mr. Sandip Muley- Executive Sourcing ITM Skills Academy, ICICI Bank both were present to execute the process of Campus Interview. For the selection of proper candidate the officials of bank held an on-line test and an interview of total participated candidates. Total 29 student candidates were participated in this process of campus Interview and at the end 13 students were selected. Principal Dr. S R Takle congratulate these 13 students for selection. For the success of this campus interview Dr. Mahesh Thorat - Inchange Placement Cell Officer, Prof. Nitin Malegaonkar, Prof. Swapanil Kulkarni, Prof. Gajanan Dhumal, Prof. Satish Jadhav takes the efforts.

**Selected candidate list**

| Sr.No. | Name of the Candidates |
|---|---|
| 1 | Shital Sonawane |
| 2 | Gayatri Mehta |
| 3 | Mayur Lahane |
| 4 | Priti Gore |
| 5 | Suvarna Tupe |
| 6 | Priya Dahinde |
| 7 | Mangesh Bhorge |
| 8 | Aditya Wahatule |
| 9 | Amol Pawar |
| 10 | Mangesh Bhorge |
| 11 | Shubham Chavan |
| 12 | Pradip Thoke |

| | |
|---|---|
| 13 | Amol Sawadekar |

## Internal Quality Assurance Cell: 2019-20

1) **Induction Meeting**:-IQAC Cell has arranged Induction Meeting with the students who have admitted to the college in the year 2019-20. Principal Dr. S. R. Takle presided over the function. All the faculty members provided the information about the departments and various curricular, co-curricular and extracurricular activities. 126 students were present for the Meeting. The Induction Meeting was arranged on 28th August 2019.
2) **National Workshop** :-IQAC has arranged National Workshop on Intellectual Property Rights & E-content Development at Swami Ramanandteerth Research Insitutue, Aurangabad on 29th Feb 2020. 91 participants registered for the workshop.
3) **AQAR**:- For the year 2018-19 is finalized and uploaded on the website of the college.
4) Meetings with stakeholders like parents, Alumni, Teaching and Non-teaching staff is conducted.
5) Meeting with Alumni: 07/03/2020
6) Meeting with Parents: 17/02/2020
7) Meeting with Teaching & Non-Teaching Staff: 31/01/2020, 08/01/2020, 28/09/2020.
8) NIRF data is submitted on 05/12/2019 and uploaded on college website.

## Competitive Examination Department

1) **Guest Lecture**:- On 20th December 2019 Competitive Exam Department organized a Guest Lecture of Mr. Siddheshwar Konghe (Director of SARATHI EDUCATION Aurangabad) on the Topic of चBest career opportunities in Bankingछ. In the speech Mr. Siddheshwar Konghe explained the various points of Banking exam schedule, Post which are Filled by IBPS, Qualification Required for Appearing to the Exam, PO

Exam, SO Exam, paper pattern syllabus, mark distribution, passing percentage, books to read, how to make study plan.

2) **Guest Lecture**:- On 20th December 2019 Competitive Exam Department organized a Guest Lecture of Mr. Ashwin Bhawar (SARATHI EDUCATION Aurangabad) on the Topic of "Overview of UPSC and MPSC Examination". In the speech Mr. Ashwin Bhawar explained the various points of UPSC and MPSC. Like exam schedule, paper pattern Syllabus, mark distribution, books to read, how to make study plan, interview, annual time planning.

3) **Motivational Video lecture**:- On 26th September 2019, Competitive Exam Department conducted the video lecture of Mr. Ansar Shaikh, who is the Youngest IAS at the age of 21 years old years. The Main objective of this video lecture is to motivate students and give them hint on "How to Prepare for Competitive Exams". This video lectures focuses on how to plan, how to study, what things are necessary to accomplish your goal, etc.

## सामाजिकशास्त्रे अभ्यास मंडळ

१) **वार्षिक अंकाचे प्रकाशन:**-दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने महात्मा गांधी या विषयावरील महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष,मा. श्री. हरिभाऊ बागडे (नाना), उपाध्यक्ष, श्री. देवजीभाई पटेल, सचिव, श्री. शामसुंदर नाईक, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले. या अंकात एकूण ३० विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख छापण्यात आले.

२) **प्रतिनिधी निवड:-** सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांचे विशेष प्रतिनिधी त्याच्या विषयाच्या विभागप्रमुखांनी निवडून सामाजिकशास्त्र विभागाकडे सादर केली. इतिहास विभाग प्रतिनिधी शिवानी कडूबा चंद्रे, राज्यशास्त्र विभागाचा प्रतिनिधी राजू खरात, समाजशास्त्र विभागात प्रतिनिधी दीपाली बोलकर यांची निवड करण्यता आली. त्यांनी वर्षभर सामाजिकशास्त्राच्या कार्यक्रम उपक्रमात सहभाग घेतला.

**३) भित्तीपत्रकाचे प्रकाशन:-**सामाजिकशास्त्र व आंतरविद्याशाखीय संबंध या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन दि. २६ सप्टेंबर २०१९ रोजी प्रा. डॉ. विनोद बोरसे, प्रा. डॉ. कारभारी भानुसे, प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे प्रमुख प्रा. विजय पांडे यांच्या हस्ते करण्यात आले.

**४) सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन:-**महाविद्यालयातील सामाजिकशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन दि. २६ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयातील सभागृहात डॉ. विनोद बोरसे (इतिहास विभाग, आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी) यांच्या हस्ते सकाळी ११:०० वा. करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी सामाजिकशास्त्रांचे मानवी जीवनातील मूल्य या संदर्भाने विवेचन केले.

**५) वार्षिक अंक २०२०-२०२१:-** शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये नैतिक मूल्य या विषयावर वार्षिक अंक काढण्याचे बैठकीत ठरवण्यात आले. त्यानुसार सूचना काढून विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय सूचना फलकावर लावण्यात आले.

## वाङमय मंडळ

**१) वाङमय मंडळाचे उद्घाटन:-**शैक्षणिक वर्ष २०१९-२०मध्ये महाविद्यालयातील वाङमय मंडळाचे उद्घाटन विद्यार्थ्यांमध्ये साहित्यीक अभिरुची निर्माण करण्याच्या उद्देशातून दि. ३१ जुलै २०१९ रोजी प्रा. डॉ. गोविंद बोरसे (शिवाजी महाविद्यालय, कन्नड) यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा. डॉ. गोविंद बोरसेयांनीसाहित्यातूनच मानवी मूल्यांची रुजवन विद्यार्थ्यांच्या जीवनात होते असे मत मांडले.याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर होते. तर कार्यक्रमासाठी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक यांची उपस्थिती होती. याप्रसंगी वाङमय मंडळाची प्रमुख म्हणून बी. ए. प्रथम वर्षाची विद्यार्थीनी पूजा पवार हीची निवड करण्यात आली.

२) **विद्यापीठस्तरीय काव्यवाचन प्रतियोगितेचे आयोजन:-**महाविद्यालयामध्ये प्रतिवर्षाप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये हिंदी विभाग व वाङमय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय काव्यवाचन प्रतियोगीतेचे आयोजन २० सप्टेंबर २०१९ रोजी करण्यात आले. या प्रतियोगीतेमध्ये एकूण ८ महाविद्यालयाच्या ९ प्राध्यापक व २४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सामाजिक, राजकीय व प्रेम, जीवन, सोशल मिडीया अशा विविध विषयावर आपल्या कविता सादर केल्या. या स्पर्धेसाठी प्रा. डॉ. शिवाजी सांगोळे (मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन), प्राचार्य लियाकत शेख (लोकसेवा कला, विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद) प्रा. शितल बियाणी (राजर्षी शाहू महाविद्यालय, वाळूज) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेमध्ये प्रियंका हाकवने (दगडोजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज) या विद्यार्थीनीचा प्रथम तर कु.मानसी पवार (प्रस्तुत महाविद्यालय) हीचा द्वितीय तर प्रसादिका जोशी (लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद) हीचा तृतीय क्रमांक आला.स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय विद्यार्थ्यांना बक्षीस व प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यता आले.

३) **भित्तीपत्रीकेचे अनावरण:-** महाविद्यालयामध्ये हिंदी विभाग व वाङमय मंडळ विभागातील विद्यार्थ्यांनी १४ सप्टेंबर २०१९ रोजी हिंदी दिनानिमित्त बनवलेल्या भित्तिपत्रिकेचे विमोचन विभागातील प्राध्यापकांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांनी साहित्यकार व त्यांचे विचार या विषयावर भित्तिपत्रीका बनवली होती. यामध्ये पूजा पवार, कविता कोरडे, आरती बोरसे या विद्यार्थीनींचा समावेश होता.

४) **महाविद्यालयीन व विद्यापीठस्तरीय विविध साहित्यीक स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन:-** महाविद्यालयातील वाङमय मंडळाचा उद्देश हा प्रामुख्याने विद्यार्थ्यांमध्ये साहित्याबद्दल रुची निर्माण करणे व त्यांच्या सुप्त गुणांना वाव देणे तसेच त्यांचे कौशल्य, वक्तृत्व यांचा विकास करणे हे आहे. म्हणून महाविद्यालयाच्या सुरवातीपासून साहित्यासंबंधी रुची असणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध काव्यवाचन, वक्तृत्व, वादविवाद स्पर्धामध्ये भाग घेण्यासाठी या विभागामार्फत मार्गदर्शन केले. म्हणून विविध स्पर्धामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी यश मिळवले. त्यामध्ये प्रामुख्याने विद्यापीठस्तरीय काव्यवाचन स्पर्धेत कु. मानसी पवार या विद्यार्थीनीने प्रथम क्रमांक मिळवला तर आंतरमहाविद्यालयीन काव्यवाचन स्पर्धेत कु. दिपाली बोलकर या विद्यार्थीनीने तृतीय क्रमांक मिळवला. अशा पद्धतीने वेगवेगळ्या स्पर्धांसाठी वाङमय मंडळाच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन मार्गदर्शन करण्यात आले.

## महिला सबलीकरण समिती

१) **महिला आरोग्य तपासणी शिबीर:-** महाविद्यालयातील विद्यार्थीनींमध्ये आपल्या आरोग्याविषयी जाणिव जागृती व्हावी म्हणून दरवर्षी प्रमाणे यावर्षीही दि. २८ ऑगस्ट २०१९ रोजी महिला आरोग्य तपासणीसाठी फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ. सिंकदर शेख व सिस्टर अनिता भालेराव हे आले होते. त्यांनी मुलींना कोणता आहार घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन केले. सदरील शिबिरात ४० मुलींची आरोग्य तपासणी करण्यात आली. ज्यात मुलींमध्ये हिमोग्लोबिनची कमतरता, पोटदुखी व कुपाषण आदी समस्या दिसून आल्या.

२) **पोस्टर स्पर्धा आणि वादविवाद स्पर्धा:-** राष्ट्रमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त दिनांक ०३ जानेवारी २०२० रोजी "स्त्री-पुरुष समानता" या विषयावर पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पोस्टर स्पर्धेत ६ मुलींनी सहभाग घेतला होता. ज्यापैकी कु. दिपाली सुधाकर बोलकर व कु. हर्षदा खोंन्डे हीने अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच "आजची स्त्री सुरक्षित आहे का?" या विषयावरील वादविवाद स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. वादविवाद स्पर्धेत आठ विद्यार्थीनींने सहभाग घेतला. ज्यापैकी नकारात्मक बाजू मांडणारी कु. मृणाली मनोरकर व सकारात्मक बाजू मांडणारी कु. दिपाली बोलकर हिने अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला. सदरील स्पर्धेचे परीक्षण प्रा. नितीन माळेगावकर व डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी केले होते.

**३) जागतिक महिला दिन:-** महाविद्यालयात दिनांक ११ मार्च २०२० रोजी जागतिक महिला दिनानिमित्त जेंडर सेन्सटायझेशन प्रोग्रॅम अंतर्गत विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. रेखा मेश्राम (सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, राजर्षी शाहू महाविद्यालय, पाथ्री) यांनी "महिला सुरक्षा काळाची गरज" या विषयावर उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भूषविले.

## मराठी विभाग

**१) अभ्यागत तासिका:-**शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम सत्रात एक व द्वितीय सत्रात एक याप्रमाणे दोन अभ्यागत तासिकांचे आयोजन करण्यात आले होते. दि. १३ सप्टेंबर २०१९ रोजी डॉ. ज्योती स्वामी यांनी अभ्यागत तासिका घेतली. डॉ. ज्योती स्वामी (पं. नेहरु कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय) यांनी प्रथम वर्षाच्या वर्गात काव्यात्म साहित्यातील केशवसुतांची "नवा शिपाई" या कवितेचे अध्यापन केले.

दुसरी अभ्यागत तासिका दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी डॉ.ललित अधाने (मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर) यांनी तृतीय वर्षाच्या वर्गात साहित्य निर्मिती प्रक्रिया याविषयावर घेतली.

**२) भित्तीपत्रक:-** दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजी डॉ. छाया महाजन (प्रख्यात मराठी लेखिका) यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच दुसरे भित्तीपत्रक दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजीललीत अधाने यांच्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. मराठीच्या "बोली" वर आधारीत हे भित्तीपत्रक बनविण्यात आले होते.

**३) अभ्यास सहल:-**दिनांक १४ सप्टेंबर २०१९ रोजी भाषा विषयाची अभ्यास सहल बुद्ध लेणी व विद्यापीठ परिसर, तसेच दैनिक लोकमत समाचार या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.एकूण ३२ विद्यार्थी या सहलीमध्ये सहभागी झाले होते. बुद्ध लेणीला भेट दिल्यानंतर सर्व विद्यार्थी व प्राध्यापक दैनिक लोकमत समाचार कार्यालयास भेट देण्यासाठी जालना रोड, औरंगाबाद येथील लोकमत भवनकडे रवाना झाले. याठिकाणी कॉन्फरन्स हॉलमध्ये अमिताभ श्रीवास्तव (संपादक, दैनिक लोकमत) यांनी विद्यार्थ्यांशी एक तास संवाद साधला. यादरम्यान त्यांनी पत्रकारिता म्हणजे काय? पत्रकारिते समोरील आव्हाने व संधी याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**४) मातृभाषा दिवस:-** दिनांक २१ फेब्रुवारी २०२० रोजी महाविद्यालयात मातृभाषा दिवस साजरा करण्यात आला. डॉ. सुरेश मुंढे (हिंदी विभाग) यांनी "भारतीय भाषेतील वैविधता" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**५) मराठी भाषा सप्ताह:-** दिनांक २१ ते २७ फेब्रुवारी २०२० या दरम्यान मराठी भाषा सप्ताह मानण्यात आला. या निमित्ताने विविध प्रकल्प राबविण्यात आले. दि. २२ फेब्रुवारी २०२० रोजी सप्ताहाचे उद्घाटन

करण्यात आले. डॉ. अश्विन रांजणीकर हे उद्‌घाटक म्हणून उपस्थित होते तर डॉ. संदीप जगताप हे अध्यक्षस्थानी होते. "मराठी भाषेचे वैशिष्ट्ये" याविषयावर डॉ. अश्विन रांजणीकर यांनी विवेचन केले. दि. २४ फेब्रुवारी २०२० रोजी बातमी लेखन कार्यशाळा घेण्यात आली. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी विद्यार्थ्यांना "बातमी लेखन : तंत्र, स्वरुप व उपयोजन" या विषयावर मार्गदर्शन केले. दि. २५ फेब्रुवारी २०२० रोजी "मराठीतून स्वाक्षरी" हा उपक्रम राबविण्यात आला. प्रा. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी उपस्थितांना मराठी स्वाक्षरीचे काही नमुने सादर केले. फलकावर अगोदर पूर्ण नाव लिहून दाखविणे व त्याअनुसार स्वत:ची स्वाक्षरी मराठीतून करणे, त्यात काय सुधारणा अपेक्षित आहे? हे डॉ. पांचाळ यांनी समजावून सांगून काही नमूने स्वाक्षरीचे सादर केले.

६) **आंतरमहाविद्यालयीन कविता वचान स्पर्धा:-** चे आयोजन मराठी भाषा सप्ताहनिमित्त करण्यात आले होते. दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी स्पर्धा घेण्यात आली. यात एकूण १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेतील पुरस्कार विजेते: प्रथम, योगेश सोनवणे (यशवंत महाविद्यालय, सिल्लोड), द्वितीय, कु. मानसी पवार (प्रस्तुत महाविद्यालय), तृतीय, कु. दिपाली बोलकर (प्रस्तुत महाविद्यालय).

७) **मराठी भाषा गौरव दिन:-**दि. २७ फेब्रुवारी २०२० रोजी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यानिमित्ताने प्रा. डॉ. लिलित अधाने (मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर) यांचे "मराठी भाषा : काल आणि उद्या"या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते. त्यांनी उपस्थितांना दीड तास सखोल मार्गदर्शन केले व मराठीला संतांचा वारसा लाभलेला आहे. त्यामुळे ती आजही तग धरुन आहे, असे विधान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते. याप्रसंगी काव्यवाचन स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

## हिंदी विभाग

१) **प्रेमचंद जयंती समारोह:-** ३१ जुलाई २०१९ को दिन प्रेमचंद जयंती के उपलक्ष्य में कार्यक्रम का आयोजन किया गया। उसी दिन शिवजी महाविद्यालय, कन्नड के हिंदी विभागाध्यक्ष डॉ. गोविंदजी बुरसे प्रमुख अतिथि के रुप में उपस्थित थे । कार्यक्रम के अध्यक्ष के रुप में महाविद्यालय के उपप्राचार्य डॉ. पी. एम. कल्याणकर थे । कार्यक्रम का प्रास्ताविक डॉ. दत्तात्रय येडले तथा आभार ज्ञापन डॉ. सुरेश मुंढे ने किया। कार्यक्रम के समय डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय कक्ष में प्रेमचंदजी के साहित्य की प्रदर्शनी लगायी गयी थी। मान्यवर अतिथि के करकमलों से प्रदर्शनी का विमोचन किया गया। कार्यक्रम में अतिथि ने प्रेमचंद के साहित्य संबंधी छात्रों को मार्गदर्शन किया।

२) **हिंदी सप्ताह:-**१४ से २० सितंबर २०१९ के दौरान हिंदी विभाग द्वारा हिंदी सप्ताह का आयोजन किया गया। इस सप्ताह के बीच हिंदी विषय की विभिन्न प्रतियोगिताओं का आयोजन किया गया। प्रतियोगिताओं में काव्यलेखन, हिंदी शेर-सुविचार, निबंध लेखन, कहानी लेखन, काव्यवाचन, काहानी कथन, भाषण प्रतियोगिता, लेखन शुद्धता और हिंदी सामान्यज्ञान प्रतियोगिता का समावेश किया था।

हिंदी सप्ताह के उद्‌घाटन समारोह में प्रमुख अतिथि के रुप में प्राचार्य, डॉ. लियाकत शेख (लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद) से उपस्थित थी। राष्ट्रभाषा हिंदी की ओर से हिंदी सप्ताह (तिथि १४ से २० सितंबर २०१९) के उपलक्ष में सभी छात्र/छात्राओं के लिए विभिन्न प्रतियोगिताओं का आयोजन किया गया था। हिंदी सप्ताह के दौरान ली गई विभिन्न प्रतियोगिताओं मे प्रथम, द्वितीय तथा तृतीय स्थान प्राप्त करनेवाले छात्रों के नाम समापन समारोह में घाषित किए गए। इन्ही छात्रों को वार्षिक स्नेहसंमेलन में प्रमाणपत्र दिए गए।

३) **विश्वविद्यालय स्तरीय भित्तीपत्रिका प्रतियोगिता:-** तिथि १९ सितंबर २०१९को आयोजित प्रतियोगिता में राजर्षी शाहु महाविद्यालय, वाळूज, औरंगाबाद, रामदास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राजर्षी शाहू महाविद्यालय, पार्थी, चेतना कला महाविद्यालय, हर्सुल-सावंगी, औरंगाबाद, मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, ता. सिल्लोड, लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद, दगडूजीराव देशमुख महाविद्यालय, वाळूज, औरंगाबाद, वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, सहभागी हुए। इस प्रतियोगिता में प्रथम प्रियंका हाकवेन, दगडुजीराव देशमुख महाविद्यालय, वाळुज, द्वितीय कु. मानसी पवार, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री, द्वितीय सय्यद फरीन, राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी, द्वितीय सिमा शेख, मोरेश्वर महाविद्यालय, भोकरदन, ता. सिल्लोड, तृतीय प्रसादीका जोशी, लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद, तृतीय अश्विनी साबळे, राजर्षी शाहु महाविद्यालय, पार्थी, तृतीय मंगल पळसकर, चेतना महाविद्यालय, हर्सुल-सांवगी, उत्तेजनार्थ पंकज आडे, वसंतराव नाईक महाविद्यालय, औरंगाबाद आदि छात्र-छात्राओं ने क्रमांक प्राप्त किए। इस कार्यक्रम के अध्यक्ष प्राचार्य डॉ. लियाकत शेख (लोकसेवा महाविद्यालय, औरंगाबाद) उपस्थित थे। अध्यक्ष के रुप में प्राचार्य डॉ. एस. आर. टकले उपस्थित थे। प्रतियोगिता में सहभागी एवं विजेता छात्र-छात्राओं को बक्षिस राशी एवं प्रमाणपत्र प्रदान किये गये।

४) **भित्तिपत्रिका:-** तिथि १८/०९/२०१९, विषय :- पाणी केरा बुदबुदा सामाजिक प्रश्न एवं उपाय और तिथी १८/०२/२०२० विषय:- ।

५) **अतिथी अध्यापन वर्ग:-** प्रा. डॉ. शितल बियानी (राजर्षी शाहू महाविद्यालय, वाळूज, औरंगाबाद) के अध्यापिकाने ने तिथि २३/०९/२०१९, सोमवार के दिन हिंदी साहित्य परंपरा इस विषय पर छात्रों को मार्गदर्शन किया। प्रा. डॉ. टिपुसुलतान सय्यद (हिंदी विभाग, मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबाद) के अध्यापक ने रोजगार सुअवसर इस विषय पर तिथि १८/०२/२०२०, मंलवार को छात्रों को मार्गदर्शन किया।

६) **हिंदी अध्यापन में सूचना प्रौद्योगिकी तकनीक का प्रयोग:-** तिथि २१ अगस्त २०१९ - हिंदी साहित्य का इतिहास, ११ सितम्बर २०१९ - हिंदी कथा साहित्य, १७ दिसम्बर २०१९ - साहित्यशास्त्र, ०८ जनवरी २०२० - हिंदी कथा साहित्य। शैक्षणिक वर्ष २०१९-२० में PPT तासिकाएँ ली गई।

७) **हिंदी विभाग में आगमनस्त मान्यवर अतिथी:-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० में राष्ट्रभाषा हिंदी विभाग को कई मान्यवरों ने अतिथी के रुप में भेट दी। जिसमें प्रमुख १) श्री. निवृत्ती रतिलाल पाटील (व्यवस्थापक, युनिक ऑफ औरंगाबाद), २) डॉ. छाया महाजन (प्राचार्य तथा प्रसिद्ध साहित्यिका, औरंगाबाद)

८) **हिंदी भाषा - छात्र यात्रा:-** तिथि १४ सितम्बर २०१९ को दैनिक लोकमत समाचार पत्र के मुख्य कार्यालय, औरंगाबाद तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, औरंगाबाद परिसर में स्थित औरंगाबाद गुफाओं में छात्र अध्ययन यात्रा का आयोजन किया गाया। छात्र अध्ययन यात्रा के कारण उत्साहित हुए तथा अपनी वैभवशाली प्राचीन कला से आत्मसंतुष्ट एवं प्रभावित हुए।

९) **प्रकल्प :-** बी. ए. तृतीय वर्ष के मुख्य विषय के छात्रों के लिए विश्वविद्यालय ने दी गई सूचनाओं के अनुसार प्रकल्प कार्य १०० अंकों की परीक्षा विभाग स्तर पर ली गई।

## Department of English

1) **Guest Lecture**1:- Dr. Shaikh Parvez (Assistant Professor & Head of Department English, Lokseva College, Aurangabad) has deleivered a guest lecture on Parts of Speech and English Grammar on 01/10/2019.
2) **Guest Lecture** 2:- Dr. Ravikant Jadhav (Assistant Professor, Kala Varishta Mahavidyalaya, Harsool Sawangi) has delivered a lecture on Sentences and Types on 11/02/2020.
3) **Wall Poster** 1:-Published Wall poster on Parts of Speech on 01/10/2019.
4) **Wall Poster 2**:-Published Wall poster on Sentence & Types on 11/02/2020.
5) **Study Tour**:-Study tour is taken to Budhha Leni, Dr. B.A.M.U. Aurangabad and Lokmat newspaper in collaboration with Department of Hindi & Marathi on 14$^{th}$ September 2019.

## इतिहास विभाग

१) **हैदराबाद मुक्तीसंग्राम दिन:**-१७ सप्टेंबर २०१९ रोजी महाविद्यालयात "हैदराबाद मुक्ती लढा स्वातंत्र्याची परिपूर्णता" या विषयावर डॉ. जगदीश भेलोंडे (इतिहास विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, कन्नड) यांचे व्याख्यान आयोजित केले होते. याप्रसंगी त्यांनी भारतीय स्वातंत्र्याची परीपूर्णता करण्यासाठी आणि जनतेची ब्रिटीश आणि निजाम, रझाकार यांच्या गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी हैदराबाद मुक्तीलढा लढवला गेला. स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, माणिकचंद पहाडे, आ.कृ. वाघमारे, अनंत भालेराव यांनी या लढ्याचे नेतृत्त्व केले. जनतेचा उत्स्फुर्त लढा आणि भारताच्या सार्वभौमत्वाचा

प्रश्न या कारणाने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी ऑपरेशन पोलो राबवून १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाला शरण आणले. विनाअट हैदराबाद संस्थान भारतात विलीन करण्यात आले. हैदराबाद मुक्तीलढ्याने खऱ्या अर्थाने भारतीय स्वातंत्र्याची परीपूर्ती केली असे प्रतिपादन केले.

२) **भित्तीपत्रक १:-** दि. १७ सप्टेंबर २०१९ रोजी हैदराबाद मुक्तीसंग्राम दिनी जालियनवाला बाग हत्याकांड:शताब्दी वर्षे या विषयावर डॉ. जगदीश भेलोंडे (इतिहास विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, कन्नड) यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. हे भित्तीपत्रक पूजा पवार, कविता कोरडे, दिपाली शेजूळ, सुषमा ससाणे, सुजाता देवमाळी, जयश्री वाघ, शिवानी चंद्रे, निवृत्ती गाडेकर आणि दिपाली बोलकर या संपादक मंडळांनी तयार करुन त्याची डिजीटल प्रिंट आणली. प्रा. विजय पांडे व प्रा. दिनेश कचकुरे यांनी सदर भित्तीपत्रक तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३) **भित्तीपत्रक २:-** दि. ९ जानेवारी २०२० रोजी "सिंधू संस्कृती : स्थळे व वैशिष्ट्ये" या विषयावर डॉ. शिवाजी डापके, प्रभात महाविद्यालय, निधोना यांच्या हस्ते भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. हे भित्तीपत्रक जयश्री वाघ, शिवानी चंद्रे, सुजाता देवमाळी, पूजा पवार, कविता कोरडे, दिपाली बोलकर आणि सोमिनाथ सहाने या संपादकीय मंडळानी तयार करुन त्याची डिजीटल प्रिंट आणली. सदर भित्तीपत्रक तयार करण्यासाठी प्रा. विजय पांडे व प्रा. दिनेश कचकुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

४) **अतिथी व्याख्यान १:-** दि. २६ सप्टेंबर २०१९ रोजी १०:५० ते ११:४० या वेळेत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी इतिहास लेखनशास्त्र, पेपर नववा, अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. कारभारी भानुसे, (शिवाजी महाविद्यालय, कन्नड) यांनी आंतरविद्याशाखीय संबंध या विषयावर अध्यापन केले.

५) **अतिथी व्याख्यान २:-** दि. ०९ जानेवारी २०२० रोजी बी.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ११:४० ते १२:३० या वेळेत भारताचा प्रारंभीचा इतिहास, पेपर सातव्यामधील बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान या विषयावर डॉ. शिवाजी डापके (प्रभारी प्राचार्य, प्रभात महाविद्यालय, निधोना) यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

६) **छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती:-** दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची प्रासंगिकता या विषयावर प्रा. डॉ. भास्कर टेकाळे (श्री संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगांव) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करतांना महाराजांनी विश्वासू सहकारी निर्माण केले. हे सहकारी निर्माण करतांना त्यांच्यावर जबाबदारीने काम टाकून तो सहकारी ते काम पूर्ण करेल हा विश्वास निर्माण केला. हा विश्वास आज आपल्यामध्ये येणे आवश्यक आहे. व्हिएतनाम सारखा देश गनिमिकावा विद्यमान काळात स्विकारतो त्यावरुन महाराजांच्या युद्धनितीची प्रासंगिकता किती आहे, हे लक्षात येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी आम्ही वेगवेगळ्या

विचारांमध्ये वाढून घेता. परंतु त्यांच्या विचारांची वाटणी करण्यापेक्षा तटस्थपणे छत्रपती शिवाजी महाराज समजून घेणे आजची गरज आहे. प्रतिकुलतेलाही अनुकूल कसे बनवायचे हे छत्रपती शिवाजी महाराजांकडून तरुणांनी अनुसरण्यासारखे आहे. सुत्रसंचलन कु. दिपाली बोलकर, आभार कु. अश्विनी बनसोडे यांनी केले.

७) **अभ्यास सहल:-**महाविद्यालयाच्या इतिहास विभागाची शैक्षणिक सहल हर्सुल कारागृह, औरंगाबाद या ठिकाणी दि. ०६ फेब्रुवारी २०२० रोजी काढण्यात आली. हुर्सल कारागृहाची बांधणी, कारागृहातील प्रशासन, कारागृहातील वस्तू निर्मिती, कारागृहातील कैद्यांची व्यवस्था या संदर्भाने दिवसभर विद्यार्थ्यांनी माहिती घेतली व कैद्यांशी संवाद साधला. तसेच वेगवेगळ्या भागातील निजामकालीन बांधलेल्या इमारतींची पाहणी केली.

## राज्यशास्त्र विभाग

१) **विद्यार्थी चर्चासत्र:-** दि. ०६ ऑगस्ट २०१९ रोजी राज्यशास्त्र विभागात विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्र आयोजित करण्यात आले. चर्चासत्राचा विषय "कलम ३७० रद्द व जम्मू-काश्मिरचे विभाजन" हा होता. चर्चासत्रात १२ विद्यार्थी व विभागातील दोन प्राध्यापकांनी सहभाग घेतला.

२) **अतिथी व्याख्यान:-**राज्यशास्त्र विभागात पहिल्या सत्रातील अतिथी व्याख्यान दि. ३० सप्टेंबर २०१९ रोजी आयोजित करण्यात आले. व्याख्याते प्रा. सुर्यकांत सांभाळकर (विनायकराव पाटील महाविद्यालय, कन्नड) यांनी "नागरिकत्त्व आणि हक्क" या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

३) **संविधान दिन:-**दि. २६ नोव्हेंबर २०१९ हा संविधान दिन महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने साजरा करण्यात आला. सकाळी ११.०० वा. भारतीय संविधानासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. त्यानंतर उद्देशपत्रिकेचे वाचन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक सहभागी झाले होते.

४) **महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती:-** दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त राज्यशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून प्राचार्य डॉ. अशोक नाईकवाडे (संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव) हे उपस्थित होते. "महात्मा गांधींच्या विचारांची सद्यस्थितीत प्रासंगिकता" या विषयावर प्राचार्य डॉ. नाईकवाडे सरांनी आपले विचार व्यक्ते केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी केला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

५) **निबंध स्पर्धेचे आयोजन:-**राज्यशास्त्र विभागाच्या वतीने महात्मा गांधींच्या १५० व्या जयंती निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दि. १४ सप्टेंबर २०१९ रोजी विद्यापीठ स्तरीय निबंध स्पर्धेची सूचना काढण्यात आली. निबंध स्पर्धेचे विषय- १) महात्मा गांधीचा स्वच्छतेचा संदेश, २) महात्मा गांधींचे जीवन व कार्ये, ३) महात्मा गांधींचे शिक्षण विषयक विचार, ४) महात्मा गांधी आणि पर्यावरण संवर्धन, ५) महात्मा गांधीचा सत्य व अहिंसेचा विचार इत्यादी. निबंध स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ७०० रु., द्वितीय पारितोषिक ५०० रु., तृतीय पारितोषिक ३०० रु. ठेवण्यात आले होते. दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी जयंती दिवशी प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. अशोक नाईकवाडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

६) **भित्तीपत्रक प्रकाशन:-**राज्यशास्त्र विभागाचे प्रथम सत्रातील भित्तीपत्रक दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी प्रमुख अतिथी प्राचार्य डॉ. अशोक नाईकवाडे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. भित्तीपत्रकाचे शिर्षक "महात्मा गांधींजी का जीवनक्रम"असे होते.

**१) ग्रंथसंपदा:-** शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मधीलएकूण ग्रंथसंपदा -७२७९, (रु.१५,३१५१७), नियतकालीके व वर्तमानपत्रे जाने २०१९ ते डिसें २०१९ या कालावधीसाठी एकूण ३० नियतकालीके व जर्नल्स, मासिकांची वार्षिक वर्गणी भरण्यात आली. १४ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षा, हिंदी, मराठी, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इंग्रजी, इतिहास, राज्यस्तरीय मासिके व नियतकालीके असे एकूण ४०२३७ रु. वार्षिक वर्गणी नियतकालीक विभागावर खर्च करण्यता आली. तसेच ग्रंथालयात N-List, E-Resource अंतर्गत (ई-बुक्स ३,१३५,८०९, ई-जर्नल्स ८९३७) Inflibnet Ahemdabad या संस्थेचे रु. ५९३० वार्षिक वर्गणी (एप्रिल २०१९ ते मार्च २०२०) पर्यंतची वार्षिक सभासद फीस भरवण्यात आली.

**२) देवघेव नोंद:**-ग्रंथालय विभागातील सर्व ग्रंथाची देवघेव व रेकॉर्डस हे LIBMAN Master Software, Nagpur या संगणक प्रणालीद्वारे देवाण घेवाण केली जाते.तसेच ग्रंथालयातील उपलब्ध ग्रंथाबद्दलची माहिती विद्यार्थी व प्राध्यापकांना व्हावी म्हणून OPAC (Online Public Access Catalogue) ग्रंथालय तालीका सुद्धा एका संगणकावर स्वतंत्र उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**३) ग्रंथालय विभागाद्वारे राबविण्यात आलेले उपक्रम:-**

१. ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली.

२. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

३. मुन्शी प्रेमचंद यांच्या जयंती निमित्त ग्रंथप्रदर्शन भरवण्यात आले.

४. महाविद्यालयातील बी. ए., बी. कॉम, बी. एस्सी प्रथम वर्गात प्रवेश घेतलेलया विद्यार्थ्यांना L-List Consetia मध्ये उपलब्ध ई-नियतकालिके व ई-बुक्स कसे हाताळावे व त्याचा वापर कसा करावा यासंदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## अभ्यासकेंद्र - श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**१) प्रवेशित विद्यार्थी संख्या:-**

| अ.क्र. | शिक्षणक्रम | कालावधी | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | पूर्वतयारी | जून-ऑगस्ट २०१९ | १३ |
| ०२ | पूर्वतयारी | जाने. २०२० ते मे २०२० | ०२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | बी. ए. प्रथम | जून २०१९ - मे २०२० | ९५ |
| ०३ | बी. ए. द्वितीय | जून २०१९ - मे २०२० | १३१ |
| ०४ | बी. ए. तृतीय | जून २०१९ - मे २०२० | ७५ |
| ०५ | बी. कॉम प्रथम | जून २०१९ - मे २०२० | २७ |
| ०६ | बी. कॉम प्रथम | जून २०१९ - मे २०२० | २२ |
| | | **एकूण** | **३६५** |

२) **उद्बोधन वर्ग:-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना उद्बोधन करण्यासाठी दिनांक १७फेब्रुवारी २०१९ रोजी अभ्यासकेंद्राचे संयोजक डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी वर्षभराच्या नियोजनाचे वेळापत्रक समजावून सांगितले व मार्गदर्शन केले. यावेळी अभ्यासकेंद्राचे केंद्र प्रमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले अध्यक्षस्थानी उपस्थित राहिले. अभ्यासकेंद्राचे समंत्रक प्रा. बाबासाहेब लहाने, प्रा. अनिल जाधव, अभ्यासकेंद्र सहाय्यक, श्री. जयराम जाधव, श्री. विनोद तुपे यांची उपस्थिती होती. तसेच या उद्बोधन वर्गासाठी बी. ए. शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

३) **समंत्रण:-** महाविद्यालयातील प्राध्यापक आपापल्या विषयाचे समंत्रक म्हणून कामकाज पूर्ण करत आहेत. याकरिता समंत्रकांना वेळापत्रकाची प्रत दिलेली आहे.

४) **वर्षभरामध्ये अभ्यासकेंद्रातील केलेली कामे:-**

१. दिनांक ०१/०६/२०१९पासून पूर्वतयारी व बी. ए. चे प्रवेश ऑनलाईन पद्धतीने सुरू झाले.

२. ऑनलाईन प्रवेश पद्धतीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

३. डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी अभ्यासकेंद्राचे २०१८-१९ या वर्षाचे जमा-खर्चाचे ऑडीट करुन घेतले.

४. पूर्वतयारी शिक्षणक्रमोच विद्यापीठाची परीक्षा दिनांक १३ ते १४ डिसेंबर २०१७ दरम्यान औरंगाबाद येथील सेंटर व विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यासंदर्भात विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यात आल्या व हॉलतिकीट डाऊनलोड करून वितरित केले.

५. मुक्त विद्यापीठाच्या मागीत वर्षीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश सुरू झाले असे सांगण्यासाठी मोबाईद्वारे संपर्क साधण्यात आला. तसेच प्रवेश अर्जांची एक प्रत आणि अभ्यास केंद्राची फीस विद्यार्थ्यांकडून स्वीकारुन ती रक्कम वेळोवेळी बँकेत जमा केली.

६. पूर्वतयारी व बी. ए. या शिक्षणक्रमाचे निकाल घोषित झाल्यानंतर विभागीय केंद्रातून गुणपत्रिका आणल्या व गुणपत्रिकाची छाननी करून आणि वितरणास सुरूवात केली.

७. विभागीय केंद्र औरंगाबाद येथे केंद्र संयोजक, समंत्रक यांचा प्रस्ताव सादर करण्यात आला. तसेच वेळापत्रक सादर करण्यात आले.

८. बी. एम. शिक्षणक्रमाचे नोव्हेंबर/डिसेंबर २०१९ परीक्षेचे विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट वितरीत केले.

९. मुक्त विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी पाठविण्यात आलेले शैक्षणिक अध्ययन साहित्य स्वीकारण्यात आले. तसेच अध्ययनार्थींना पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

१०. विद्यार्थ्यांच्या विषय निवडीबाबत त्रुटी, विद्यापीठाचे श्रेयांकतरची फीस भरण्याबाबतच्या त्रुटी आणि अभ्यासक्रेंद्राची फीस व फॉर्म न भरलेले विद्यार्थी यांच्याशी वेळोवेळी संपर्क केला.

११. विद्यार्थ्यांना गृहपाठाचे प्रश्न देण्यात आले. तसेच त्याच्याकडून गृहपाठ स्वीकारण्यात आले.

**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री**

**व**

**बहि:शाल शिक्षण मंडळ,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

**यांच्या संयुक्त विद्यमाने - दोन दिवशीय**

**भूजल व्यवस्थापन विषयक प्रशिक्षण शिबिर**

**पृष्ठ क्रमांक ६० ते ७५**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री येथे दि . १४ व १५ डिसेंबर २०१९ रोजी बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या विद्यमाने भूजल व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

**शिबिरपूर्व गावभेटी:-**

या शिबिराची माहिती फुलंब्री तालुक्यातील विविध गावातील लोकांना व्हावी यासाठी या शिबिराचे समन्वयक डॉ कल्याणकर पी.एम. व प्रा.पांडे व्ही. आर. तसेच महाविद्यालयातील विविध प्राध्यापकांनी विविध गावांना भेटी देऊन, शेतकऱ्यांना या शिबिराच्या पत्रिका देऊन शिबिरासंदर्भात माहिती दिली. यामध्ये दरेगाव (दरी), बिल्डा, लहाण्याची वाडी, पाल, किनगाव, वारेगाव, चिंचोली (बू.)गणोरी, कान्होरी इ.गावांना भेटी देऊन जवळपास २५० शेतकरी व गावकऱ्यांशी प्रत्यक्षभेटीद्वारे संपर्क साधून कार्यक्रमास येण्याचे निमंत्रण देण्यात आले.

**शिबिरातील विविध सत्र:**

**दि. १४ डिसेंबर २०१९, उद्घाटन सत्र:-**

या शिबिराचे उद्घाटन दि. १४ जानेवारी २०१९ रोजी सकाळी १०:३० वा.डॉ.प्रविण वक्ते (प्र-कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) यांच्या हस्ते करण्यात आले.उद्घाटन प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. कैलास पाथ्रीकर (बहि:शाल शिक्षण मंडळ, डॉ. बा. आं. म. वि.औरंगाबाद) व डॉ.प्रसन्न पाटील (प्रकल्प संचालक, सावित्रीबाई फुले महिला एकात्म मंडळ, हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद) यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष श्री.देवजीभाई पटेल हे उपस्थित होते.

या प्रसंगी शिबिराचे उद्घाटन डॉ.प्रविण वक्ते यांनी केले.याप्रसंगी बोलतांना ते म्हणाले की, भारतीय समाज हा आध्यात्मवादी व पारंपारिक शेती करणारा समाज आहे. आधुनिक शेती करण्याच्या नादात शेतकऱ्यांनी आपला उत्पादन खर्च तर वाढून घेतलाच परंतु त्याचबरोबर किटकनाशके व रासयनिक खतांच्या अती वापरातून जमीन प्रदुषित केली. तेव्हा शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाची कास तर धरावी परंतु पारंपारिक शेती ज्यामध्ये सेंद्रिय खते, गावरान बियाने यांच्या संगतीने शेती केल्यास जीवन विकसित तर होईलच, त्याचबरोबर सुखही होईल. आध्यात्मिक ज्ञानाचा फायदा शेतकरी समुदायाला शेती करतांना जीवन आनंदी ठेवण्यासाठी होईल, असा सल्ला देऊन शेतकरी मित्रांनी आत्महत्या सारखे विचारही मनात येऊ देऊ नयेत, असेही आग्रहाने सांगितले.

डॉ.कैलास पाथ्रीकर यांनी सद्यकालीन अर्थव्यवस्थेत शेतीचा खर्च अतिशय जास्त प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाला उत्पादनाचा भाव मिळत नाही. कारण सरकारने कांद्या सारख्या अनेक शेती उत्पादनाला हमीभाव दिलेला नाही.सरकारने जर पीकांचा हमीभाव ठरवून दिला तर शेतकरी वर्ग पिके घेतील व आनंदान जीवन जगतील असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

डॉ. संजय शिंदे यांनी शेतीच्या क्षेत्रात ज्या लोकांना अनुभव आहेत अशी माणसे समाजात पुढे येऊन जर त्यांनी आपल्या अनुभवांची इतर शेतकरी वर्गांबरोबर देवाण-घेवाण केली तर त्याचा फायदा शेतकरी वर्गाला होईल. आज जो वर्ग शेती करत नाही ते शेती संदर्भात अधिक बोलत असल्याचे चित्र दिसते.

डॉ.प्रसन्न पाटील यांचीही या प्रसंगी उपस्थिती होती.त्यांनी शेतीचक्राचा आढावा घेतांना सांगितले की, शेती ज्या-ज्या घटकांवर अवलंबून आहे, ते-ते घटक आपण टिकवले पाहिजे नव्हे तर त्यांचे पुनरुज्जीवन केले पाहिजे. जसे की आपण सेंद्रिय खतांचा वापर केल्यास शेतीमधील घटकतत्त्वे वाढतील, त्याचबरोबर सामुदायिक व सर्वांनी भूसंसाधरणाची कामे केल्यास मातीचा सुपीक थर वाहून जाणार नाही, पशुपालन केल्यास सेंद्रिय खते मिळतील, दुध मिळेल, त्यातून उत्पन्नही वाढेल.

उद्‌घाटनाच्या सत्रात बीजभाजक म्हणून डॉ.सर्जेराव ठोंबरे (मानद संचालक, गोपीनाथ मुंढे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था, डॉ. बा. आं. म. वि.औरंगाबाद) यांनी शेतकरी व मराठवाड्यातील जीवन हे झाड, माती आणि पाणी यांच्यावर विसंबून आहे. आपण या तिन्हींचीही नासाडी करत आहोत. त्यामुळे आपण घरापासून सुरुवात करावी.ज्यातुन आपल्या सांडपाण्यावर घराभोवती परसबाग विकसित करावी. शेती, पीक पद्धती, पाणी वापर इत्यादी शेतीसंबंधी बाबींचा समावेश हा शालेय स्तरावरील अभ्यासक्रमात जर समाविष्ठ करण्यात आला तर त्याचा भावी पिढ्यांना फायदा होऊन शेती उत्पादनात वाढ होईल. त्याचबरोबर पाणी व्यवस्थापन व्यवस्थित करता येईल.

अध्यक्षीय समारोप करतांना संस्थेचे उपाध्याय श्री. देवजीभाई पटेल म्हणाले की, भारत हा कृषीप्रधान देश आहे. पूर्वीपासून भारतात, तसेच मराठवाड्यात शेती पारंपारिक पद्धतीने होते. आधुनिक काळात एवढी प्रगती, विकास होऊनही आत्महत्या होतांना दिसतात. पंरतु पूर्वी एकही शेतकरी आत्महत्या केल्याचे दिसत नाही. त्यामुळे वर्तमान शेतकऱ्यांनी आधुनिक शेतीची कास धरावी, तंत्रज्ञानाचा उपयोग करावा जेणेकरुन आपले उत्पादन वाढेल. परंतु काही कारणास्तव जर शेती उत्पादन हाती लागले नाही तर खचून न जाता धैर्याने त्या संकटांना सामोरे जावे.

या उद्‌घाटन सत्रात प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी प्रास्ताविक करुन शिबिर आयोजनाची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी केले.

**सत्र पहिले : पाण्याचा ताळेबंद**

यावेळी भूगर्भातील पाणी या विषयावर भूजल सर्वेक्षण विकास संस्थेने एक लघुपट शेतकऱ्यांना दाखविला. यावेळी डॉ. पी. एल. साळवे (उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा) हे म्हणाले की, या लघुपटातील सांगण्याप्रमाणे गावातील शेतकऱ्यांनी भूगर्भातील पाण्याचा जबाबदारीने वापर करावा व त्याच्या वाढीसाठी सामुहिक प्रयत्न करावेत. यावेळी पाण्याचा ताळेबंद या विषयावर डॉ. शरद गायकवाड (कनिष्ठ वैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा) यांनी पीपीटीच्या आधारे आपले विचार उपस्थितांपुढे मांडले. त्यांनी

महाराष्ट्रातील पर्जन्यमानाचा आढावा घेऊन आपल्या भागातील पीक पद्धतील गावकऱ्यांनी ठरविली पाहिजे. एखाद्या भागातीज भूजल पातळी ही त्या भागात पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणाबरोबरच त्या भागातील खडकाची रचना व खडकाचा प्रकार यावर अवलंबून असते, असे मत त्यांनी मांडले. यावेळी डॉ. इरफान शहा (सेवानिवृत्त संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे) श्री. जी. डी. महाजन (सहाय्यक भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण यंत्रणा) याची प्रमुख उपस्थिती होती.

**सत्र दुसरे : फुलंब्रीतील पाझर तलाव सद्यस्थिती व उपाय योजना**

शिबिरातील दुसरे सत्र फुलंब्रीतील पाझर तलाव सद्यस्थिती व उपाय योजना या विषयावर संपन्न झाले. यावेळी डॉ. पी. एस. कुलकर्णी (स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद) यांनी पीपीटीच्या आधारे तालुक्यातील विविध ठिकाणाच्या पाझर तलावाच्या संदर्भात माहिती दिली. त्यात अनेक पाझर तलाव हे चांगल्या स्थितीत आहेत तर काहीच्या भिंतीला तडे गेलेले आहेत. काहीमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे तलावाची साठवण क्षमता कमी झालेली आहे. काही पाझर तलावाच्या ठिकाणाचा खडक कमी असल्याने पाणी जमीनीत मुरत नाही, त्यामुळे आजुबाजूच्या विहिरीची पाणी पातळी वाढत नाही, असे मत मांडले. या तलावांच्या संदर्भात योग्य नियोजन व कार्यवाही केल्यास त्यांचे पुनर्जिवन करुन पाणी साठवण क्षमता व लाभार्थी क्षेत्र विस्तारले जाऊ शकते.

**सत्र तिसरे : दु. ३.०० ते ४.३० - पाणी फाऊंडेशनचे कार्य: यशस्वी गाथा**

पाणी फाऊंडेशनचे कार्य यशस्वी गाथा या विषयावर श्री. प्रल्हाद आरसुळ यांनी पाण्याचा प्रश्न हा अतिशय गांर्भियाने घेण्याची गरज असून त्यासाठी गावाने एकत्रित येऊन कार्य करणे, उपक्रम राबविणे अपेक्षित आहे. पाणी फाऊंडेशने चिंचोली व इतर गावांमध्ये गावकऱ्यांनी एकत्रित येऊन कार्य केल्याने त्या गावाच्या पाणी पातळीत अतिशय फरक पडला आहे. तसेच प्रत्येक गावात शेतकऱ्यांना मिळणारा प्रतिसाद हा त्या गावाला पुढे नेणारा असतो हे आम्ही व गावकरी करत असलेल्या कार्यामुळे दिसून येत आहे. या सत्राचे सुत्रसंचलन प्रा. बाबासाहेब लहाने यांनी केले.

**सत्र चौथे : जलसिंचनाच्या शासकीय योजना (रविवार, दि. १५ डिसेंबर २०१९**

दि. १५ डिसेंबर २०१९, रविवार रोजी तिसऱ्या सत्रात श्री. व्ही. आर. गोराडे (कृषी कार्यालय, सिल्लोड) यांनी जलसिंचनाच्या शासकीय योजना या विषयावर अतिशय सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी शेतकऱ्यांना आपले ज्ञान वाढवण्यासाठी सकाळचा ॲग्रोवन अंक वाचावा, तसेच ग्रामपंचायतीच्या बाहेर पोस्टर रुपारे शासनाच्या विविध योजनांची माहिती अधिकारी देत असतात, त्या पहाव्यात किंवा त्या-त्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात रहावे असा सल्ला दिला. त्याचबरोबर नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, पोखरा योजना, ठिंबक सिंचन योजना, सौरपंप योजना अशासंदर्भात शासकीय योजना, अर्ज करण्याची प्रक्रिया, कालावधी, प्राप्त होणारी रक्कम, त्यासाठी असणारी पात्रता यांचा आढावा घेतला.

**सत्र पाचवे : लोकसहभागातून जलव्यवस्थापन**

श्री. नरहरी शिवपूरे यांनी या सत्रात लोकसहभागातून जलव्यवस्थापन या विषयावर विचार व्यक्त केले. मानव कितीही विकसित झाला तरीही तो पाणी निर्माण करु शकत नाही, त्याला पर्याय उपलब्ध करु शकत नाही, पाणी मोठ्या प्रमाणात आयात करु शकत नाही. त्यामुळे पाण्याचे जतन व संवर्धन करणे, ह्यातच मानवाचे हित आहे. यावेळी त्यांनी त्यांच्या संस्थेच्या माध्यमातून चित्ते नदी पूनर्जीवन या विषयावरील चित्रफित व पीपीटीच्या आधारे झालेले बदल दाखवून दिली. या सत्राचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते.

**समारोप सत्र: पाणी उपलब्धतेनुसार पीक नियोजन**

पाणी उपलब्धतेनुसार पीक नियोजन या विषयावर डॉ. सुहास आजगावकर (सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, औरंगाबाद) यांनी विचार मांडले. ते म्हणाले की, मराठवाड्यात आगोदरच पावसाचे प्रमाण कमी आहे. त्यात भूगर्भातील खडकही काळापाषान आहे. त्यामुळे भूगर्भातील जलसाठे कमी आहेत. या अनुषंगाने कमी पाण्यावर येणारी व माणसांबरोबर जनावरांच्या खाद्यांची व्यवस्था होईल अशी ज्वारी, बाजरी, तूर इत्यादी पीके घ्यावीत. या समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी श्री. शामसुंदर नाईक (सचिव, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद) हे होते.

फुलंब्री बद्दल माहिती देतांना श्री. नाईक म्हणाले की, पूर्वी फुलंब्रीस आंब्यांची भरपूर झाडे होती. त्यांची मोठ्या प्रमाणात तोड झाली. त्यांच्या स्वत:च्या शेतात आंब्यांची १०० झाडे होती हेही त्यांनी सांगितले. अगोदर भाड्याने जमीन दिली जात होत्या. परंतु शानाने कायदा करुन त्या मोकळ्या करण्याचे आदेश दिले. त्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडांची तोड झाली.

आजही शेतकऱ्यांनी फळबाग लागवडीची विचार करावा असा सल्ला त्यांनी दिला. पीक पद्धत निवडतांना पट्टा पद्धत निवडून विविध पिकांची लागवड करावी. या पद्धतीने शेतकऱ्यांनी एकरी एक लाख रुपयांपर्यंत उत्पन्न काढले आहे. शेतकऱ्यांनी सामुहिक शेतीचा अवलंब करावा असे मत त्यांनी मांडले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बाबासाहेब लहाने व डॉ. महेश थोरात यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. कल्याणकर पांडुरंग, प्रा. विजय पांडे, डॉ. संजिवकुमार पांचाळ, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. संदीप जगताप, डॉ. सुरेश मंढे यांनी प्रयत्न केले.

या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कामाचे वाटप करण्यात आले होते.

## जिल्हा योग संघटना, औरंगाबाद
## व
## श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

**पृष्ठ क्रमांक ६४ ते ७५**

**योग प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यास वर्ग**

**16 डिसेंबर 2019 ते 19 जानेवारी 2020**

**उद्दिष्ट्ये:-**

1) सामाजिक बांधिलकीतून परिसर विकासास हातभार लावणे.
2) परिसरातील महिलांचे शारीरिक, मानसिक आरोग्य वृद्धिंगत करणे.
3) आत्मिक उन्नतीसाठी प्रेरणा देणे.
4) योगाचा प्रसार व प्रचार करणे.

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये परिसरातील महिलांसाठी योग प्रमाणपत्र अभ्यास वर्ग घेण्यात आला.योग वर्गाला प्रत्यक्ष प्रारंभ करण्यापूर्वी परिसरातील महिलांच्या प्रत्यक्ष भेटी घेण्यात आल्या.योग वर्गाचे प्रत्रक परिसरात वाटप करण्यात आले.तसेच योगाची आवश्यकता या विषयी प्रबोधन करण्यात आले.त्यानुसार महिलांचा सकारात्मक प्रतिसाद लक्षत घेवून दि. 16 डिसेंबर 2019 रोजी महिला महाविद्यालयात क्रीडा विभागात एकत्रित जमवून फार्म पुर्ण करुन घेण्यात आले.व प्रत्यक्ष योग वगोस प्रारंभ करण्यात आला.डॉ.राजश्री पवार व डॉ.संदीप जगताप यांनी मार्गदर्श केले.

दि. 19 डिसेंबर 2019 रोजी रितसर योग वर्गाचे उद्घाटन सोहळा पार पडला.या उद्घाटन प्रंसगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून श्री.शरद कुलकर्णी (योग शिक्षक, औरंगाबाद) हे उपस्थित होते.त्यांनी मानवी जीवनात योगाचे महत्त्व काय आहे?याविषयी सखोल मार्गदर्शन केले.तसेच पतंजलीचे योगसूत्र या विषयी विचार मांडले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती प्रमिला आव्हाळे ह्या उपस्थित होत्या.त्यांनी स्त्रीयांच्या आरोग्य विषयी काही सूचना केल्या.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.एस.आर. टकले यांनी भूषविले.

दररोज दु.3 ते 5 या वेळेत डॉ.राजश्री पवार आणि डॉ.संदीप जगताप यांनी प्रशिक्षण दिले.तसेच वेळोवेळी विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी व प्रशिक्षण देण्यासाठी योग विषयक तज्ज्ञांना निमंत्रित करण्यात आले होते.

दि. 17 डिसेंबर 2019 रोजी श्रीमती डॉ.निती म्हस्के (वैद्यकीय अधिकारी, शासकीय ग्रामीण रुग्णालय, फुलंब्री) यांनी स्त्रियांचे आजार व आरोग्य व्यवस्थापन याविषयावर मार्गदर्शन केले.दि. 24 डिसेंबर 2019 रोजी श्रीमती लता वाघचौरे (सदस्य, पतंजली योग समिती, औरंगाबाद) यांनी आसाने, प्राणायामाचे प्रशिक्षण दिले.दि. 01 जानेवारी 2020 रोजी श्री. महेश पाटील (सेंदुणी महाविद्यालय, जळगाव) यांनी योग म्हणजे काय? याविषयावर व्याख्यान दिले.तसेच आसनांचे काही प्रकार शिकविले.दि.07 जानेवारी 2020 या रोजी डॉ.कैलास शिवणकर यांनी मार्गदर्शन केले.दि. 11 जानेवारी 2020 रोजी श्री.योगेशकुमार शर्मा (योग

नैनीताल) यांनी पतंजलीचे योगसूत्र याविषयावर भाष्य केले.तसेच याच दिवशी श्री.मनिषकुमार (सोष्ठव अंतरराष्ट्रीय योग संघटना, औरंगाबाद) यांनी आसनांचे प्रकार व प्राणायामांच्या प्रकारांचे प्रशिक्षण दिले.

डॉ.राजश्री पवार आणि डॉ.संदीप जगताप यांनी दररोज नियमीत विविध आसने, प्राणायाम, सूक्ष्म व्यायामाचे प्रशिक्षण दिले.त्यासोबतच दररोज अर्धा तास ध्यान विधी प्रशिक्षणार्थींचा घेण्यात आला.

या कोर्सच्या समारोपाचा कार्यक्रम दि. 08 फेब्रुवारी 2020 रोजी घेण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून सुरेश मिरकर (जिल्हा योग संघटना, औरंगाबाद) उपस्थित होते.तसेच अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस.आर. टकले यांची उपस्थिती होती.याप्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रमाणापत्राचे वाटप करण्यात आले व या योग वर्गाची सांगता झाली.

## मानवी मूल्य कार्यशाळा
## Workshop on Universal Values And Ethics
## दिनांक १५ फेब्रुवारी २०२०

**उद्देश:-**

आज समाजात मोठ्या प्रमाणात महिलावरील अत्याचार यासारख्या घटना वाढलेल्या आहेत. सर्व बातमीपत्रे अशा अमानवी घटनांनी भरलेली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे मानवी मूल्याचा ऱ्हास होय. असा बिकट प्रसंगी आपल्या सर्वात विशेषत: शिक्षकामार्फत विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्याची शिकवणूकीतून, आचरणातून रुजवन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. म्हणून या उद्देशाने मानवीमूल्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

१. साहित्याच्या मार्फत प्राचीन काळापासून मानवी मूल्यांची रुजवण केली जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये ही अशा कार्यशाळेच्या माध्यमातून जागृती निर्माण करणे.
२. समाजाचा मुख्य घटक म्हणून अधिकाऱ्यापासून सामान्य माणसामध्ये मानवी मूल्यांची रुजवण करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करणे.
३. अभ्यासक्रमासमासोबत साहित्याच्या मार्फत मानवी मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे, साहित्यकारांच्या सानिध्यात विद्यार्थ्यांमध्ये मानवीमूल्य विकसित करुन विद्यार्थ्यांमध्ये साहित्य निर्मितीची प्रेरणा विकसित करणे.

वरील उद्देशाच्या पूर्ततेसाठी मानवीमूल्ये कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

**कार्यशाळेचा अहवाल:-**

आपल्या महाविद्यालयात शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रंथालय कक्षात "मानवीमूल्ये कार्यशाळा (Workshop on Universal Values And Ethics" याचे आयोजन करण्यात आले.

कार्यशाळेचे नियोजन एक दिवसातील दोन सत्रात करण्यात आले होते. या कार्यशाळेत एकूण ४७ विद्यार्थी व विद्यार्थीनींनी सहभाग घेतला. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांशी सहकार्य केले. कार्यशाळेचा वृत्तांत पुढीलप्रमाणे:-

**१) उद्‌घाटन समारंभ: प्रथम सत्र:-**

कार्यशाळेच्या उद्‌घाटक व बीजभाषक म्हणून प्रसिद्ध साहित्यिका प्राचार्य डॉ. छाया महाजन, औरंगाबाद यावेळी उपस्थित होत्या तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले होते. प्रमुख अतिथीच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचा परिचय व स्वागत करण्यात आले. त्यानंतर प्राध्यापक डॉ. दत्तात्रय येडले यांनी प्रास्ताविक मांडले.

उद्‌घाटिका व बीजभाषक म्हणून उपस्थित प्राचार्य डॉ. छाय महाजन यांनी कार्यशाळेच्या उद्‌घाटनाची घोषणा केली. "साहित्य आणि मानवीमूल्य" या विषयासंबंधी उद्‌घाटिका डॉ. छाया महाजन यांनी बीजभाषण केले. मूल्ये म्हणजे काय? शाश्वत मूल्ये कोणती आणि परिवर्तनशील मूल्ये कोणती? याविषयी चर्चा करतांना त्यांचा साहित्याशी कसा संबंध आहे हे समजावून सांगितले.

"ग्रंथ माझे गुरु, ग्रंथ माय बाप, मिटविती ताप हृदयाचे!" ग्रंथाचे महत्त्व याप्रमाणे केले. इतर पशु-पक्षांपेक्षा आपण (मनुष्य) वेगळा केवळ बुद्धीप्रमाणे आहोत. त्यापेक्षाही महत्त्वाचा घटक म्हणजे पशुंना भाषा नाही. ती भाषा माणसाजवळ आहे. उत्सुकतेपोटी माणसांच्या ज्ञानकक्षा वाढल्या आहेत. त्या वाढविण्यासाठी वाचन वाढविले पाहिजे. त्यातुन मन साधू बनत असते.

साहित्य हे सत्यापर्यंत घेऊन जात असते. सत्यम, शिव आणि सुंदरम हे नीती तत्त्वे आहेत. विद्यार्थ्यांमध्ये साहित्याच्या मार्फत मूल्ये रुजविले पाहिजे असे विचार मान्यवरांनी मांडले. कार्यशाळेच्या प्रथम सत्राचे अध्यक्ष डॉ. एस. आर. टकले यांनी अध्यक्षीय समारोप सादर केला.

**२) भित्तिपत्रकाचे प्रकाशन:-**

कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रमुख अतिथीच्या हस्ते "योग्य शब्द प्रयोग" या विषयाचे विद्यार्थ्यांनी बनविलेले भित्तिपत्रक प्रकाशित करण्यात आले.

**३) समारोप समारंभ व द्वितीय सत्र:-**

या सत्राचे प्रमुख व्याख्याते श्री. निवृत्ती रतिलाल पाटील (व्यवस्थापक, युनिक ॲकॅडमी, औरंगाबाद) व अध्यक्ष म्हणून डॉ. पी. एम. कल्याणकर होते. मूल्यशिक्षण या विषयावर बोलतांना श्री. निवृत्ती पाटील म्हणाले की, मूल्यशिक्षण म्हणजे चांगला माणुस घडविण्याची प्रक्रिया होय. जन्मलेल्या कोणत्याही बाळाला कोणतीही जाणीव नसते. परंतु त्याच्या भोवताल मंडळी समाज यांच्याकडून ते मुल सर्व काही शिकत असते. अर्थातच ते इतरांचे अनुकरण करत असते. यातुनच त्यांचे चरित्र घडत जाते. बाळ जन्माला आल्यानंतर मूल्यशिक्षणाची क्रिया सुरु होते. पुढे हे बाळ नागरिक बनते व त्याच्या व्यवहारातूनच देश

ओळखला जातो. व्यक्तीचे चारित्र्य घडत असते. त्यासाठी मूल्यशिक्षणाची जाणिव शिक्षणाद्वारे करुन दिली जाते.

मूल्यशिक्षणाची गरज व सुरुवात समाज निर्मितीच्या पहिल्या अवस्थेपासून सुरु आहे. प्रत्येक धर्माची मांडणी, विचारधारा ही आचरण पद्धतीस निगडीत आहे. आजच्या युगात प्रशासकिय अधिकारी निर्मिती प्रक्रियेत मूल्यशिक्षणाचे महत्त्व याविषयाचा भाग अभ्यासक्रमाच्या माध्यमाद्वारा मांडण्यात आलेला आहे. याविषयी सखोल मार्गदर्शन श्री. निवृत्ती पाटील यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेच्या द्वितीय सत्राचे अध्यक्ष डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. कार्यशाळेचे आभार डॉ. रामकिशन लोमटे यांनी मानले.

या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील एकूण ४७ विद्यार्थी सहभागी झाले होते. अशा प्रकारे "मानवी मूल्य कार्यशाळा" संपन्न झाली. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी खूप प्रयत्न केले.

Pandit Deendayal Upadhayay Education Society's

**Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Phulambri**

**&**

**Swami Ramanand Teerth Marathwada Institute of Socio-Economic Research & National Integration, Aurangabad**

Jointly organizes a day national workshop on

**Intellectual Property Rights & E-Content Development**

**Date: 29th Feb. 2020**

Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Phulambri & Swami Ramanand Teerth Marathwada Insititute of Socio-Economic Research & National Integration, Aurangabad jointly organized a day National workshop on Intellectual Property Rights & E-Content Development on 29th Feb. 2020. The workshop was arranged at Swami Ramanand Teerth Marathwada Institute, Aurangabad. The workshop is designed in 4 basic components i.e inauguration Ceremony, Plenary Session, post lunch & Valedictory function. The workshop was inaugurated by Professor Pravin Wakte (Pro-VC, Dr.B.A.M.U. Aurangabad), Chief Guest were Dr. S.B. Warade (President, SRTMISCR), Dr. Sarjerao Thombre (Ex. Director, GMNRD, Dr. B.A.M.U. Auranagbad), Professor Karbhari Kale, Principal Dr. S.R. Takle were present on the occasion. Workshop was started with the lamp lighting ceremony and a prayer. The felicitation of Guest was carried out on the occasion. Convenor Dr. Ashwin Ranjanikar gave the introductory speech and conveyed the Importance of IPR & E-Content Development in the coming days. In the inauguration address Professor Pravin Wakte conveyed the efforts taken by the

IPR Cell of the University and urged the faculty members, researchers to register the patent. He assured that the IPR Cell of the University will provide the necessary help and support to register the IPR. Professor Karbahri Kale very elaborately pointed out the IPR in India and the need of IPR registration, various technicalities of IPR registration. His presentation was very well reciueved by the researchers, faculty members and students. Dr. Sarjerao Thombre and Dr. S.B. Wardae also motivated the participants on the occasion. Dr. Sarjeraso Thombre in his speech presented the Indian philosophy and how it should get reflected in the IPR. He also presented various examples of generosity and open-mindedness of Indian people.

The Post lunch session was conducted by Professor Chondekar. He was invited to speak on E-Content Development. His session was chaired by Shri Shyamsundar Naik ( Secretary PDUSS), Dr. Sarjerao Thombare was also present on the occasion. Professor Chondekar through the PPT delivered his lecture with suitable examples of E-Content Development. He provided various ideas of E-content Development and also presented various modules of E-Content Development. He further conveyed that he has given all his lecturers and assigments to his students with the help of E- Learning and also through online mode. The E-Content is very helpful in Teaching, Learning & Evaluation. Hence he urged all the participants to acquire the skill of E-Content Development. Shri Shyamsundar Naik and Dr. Sarjerao Thombre also spoke on the occasion. Dr. Sharad Advant (Secretary, SRTMISCR) was invited for valedictory function, Dr. Sarjerao Thombre was present as the Chief Guest on the occasion. Dr. Sharad Advant congratulated the college for organising workshop in the premises and assured that in future also our Institute will support and help all such educational activities of the college.

Ninety Seven participants registered for the workshop. All the participants were very happy to get the information about the IPR & E-Content Development. Four participants provided the feedback in the valedictory function. The Proceedings of the workshop was conveyed by Dr. Mahesh Thorat & Dr. Manjusha Nalgorkar. Vote of thanks was conveyed by Dr. Ashwin Ranjanikar. Various Committees were formed for the successful commencement of the workshop. All the faculty members and non-teaching staff members contributed their best for the workshop. Certificates were distributed after the valedictory function.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नीत व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित**

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,

**फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद.**

# राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष शिबीर

## "स्वच्छता व पर्यावरण संवर्धनासाठी युवा"

**दि. ११ ते १७ जानेवारी २०२०**

राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर दि. ११/०१/२०२० ते १७/०१/२०२० या कालावधीत मौजे लहान्याची वाडी, ता.फुलंब्री, येथे संपन्न झाले. या शिबिरात झालेल्या उपक्रमांविषयी:-

**१३) शिबीरापुर्व गावभेट**

सदर मौजे लहान्याची वाडी हे गाव महाविद्यालयापासून जळगाव रोडकडे जातांना पाल फाट्यापासून ५ किलोमिटर अंतरावर असलेले लहान्याची वाडी येथे सात दिवसीय विशेष शिबिर दि. ११ ते १७ जानेवारी २०२० या दरम्यान घेण्यात आले. गावातील स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि गाव वृक्षाच्छादीत करण्याच्या हेतूने "स्वच्छता" ही मुख्य थिम घेऊन काम करण्याचे ठरले.

शैक्षणिका वर्ष २०१९-२० च्या शिबिराच्या आयोजनासंदर्भात दि. ०७ जानेवारी २०२० रोजी सकाळी ८.०० वा. मौजे लहान्याची वाडी येथे शिबिरपूर्व गावभेटीचे म्हणजेच ग्रामस्थांसोबत बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत सर्व ग्रामस्थांना व्यक्त केलेल्या मनोगतानुसार गावात ठिकठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेवर जमलेल्या कचरा व गवत स्वच्छ करणे, हागणदारीचा प्रश्न मिटविण्यासाठी काही शौच खड्डे करणे आवश्यक असल्यामुळे यावर सर्वांचे एकमत झाले. करिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले व गावच्या सरपंच श्रीमती सौ. कल्पनाताई लहाने यांच्या संमतीनुसार सदर शिबिराची निकड म्हणून ग्रामस्वच्छता व पर्यावरण संवर्धन जागृती या विषयावर भर देण्याचे ठरवल्या गेले.

त्यानंतर कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी परत दिनांक ०९ जानेवारी २०२० रोजी लहान्याची वाडी गावास भेट देऊन शिबिराची निवास व्यवस्था, कार्यक्रमाचे ठिकाण इ. बाबी निश्चित केल्या. त्यासाठी दि. १० जानेवारी २०२० रोजी स्वयंसेवकाचे शिबिरपूर्व प्रशिक्षण घेण्यात आले. यावेळी प्रा. नितीन माळेगावकर व डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**१४)आगमण**

शिबीर पूर्ण सात दिवसाचे होण्यासाठी एक दिवस आगोदर म्हणजे दिनांक १० जानेवारी २०२० रोजी लहाण्याची वाडी गावात स्वयंसेवक मुक्कामी गेले व दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमासाठी आवश्यक सर्व सुविधांचे व्यवस्थापन केले.

**१५)उद्घाटन**

दिनांक ११ जानेवारी २०२० रोजी सकाळी ९.३० वा.शिबिराचे उद्‌घाटन ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी उद्‌घाटक म्हणून डॉ. सतीष जाधव (प्राचार्य, राजर्षी शाहू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पाथ्री) लाभले होते, त्यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. उद्‌घाटन प्रसंगी बोलत असतांना डॉ. सतीष जाधव म्हणाले की, त्यांच्या व्यक्तिमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व उपस्थित ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगिन विकास होत असतो असे म्हणाले. ग्रामीणा भागातील महत्त्वाचा प्रश्न म्हणजे स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन होय. त्यासाठी गावातील सर्व नागरिकांना आपसातील मतभेद मिटवून एकत्र येणे गरजेचे आहे, असे जाधव यांनी मत मांडले. याप्रसंगी प्रमुख पाहूणे म्हणून डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर (गटसमन्वयक, रा.से.यो. डॉ. बा. आं. म. वि. औ.बाद) श्री. कांबळे (पोलीस उपनिरीक्षक, फुलंब्री पोलीस स्टेशन) गावच्या सरपंच सौ. कल्पना लहाने, तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री. विष्णू लहाने (पोलीस पाटील), श्री. बाळू रोकडे (ग्रामसेवक), सौ. परिघाबाई बहादूरे (पंचायत समिती सदस्य) इ. उपस्थित होते. श्री. कांबळे व डॉ. ज्ञानश्वर पाथ्रीकर यांनी शिबिरार्थींना शुभेच्छा दिल्या. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले हे होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात गावकऱ्यांकडून विद्यार्थ्यांना सात दिवसीय शिबिरासाठी त्यांच्या सहभागाची व सहकार्याची अपेक्षा केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पी. एम. कल्याणकर, जिल्हा परिषद हायस्कूलच्या मुख्याध्यापिका __________, प्राध्यापक वृंद आणि गावकरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. नितीन माळेगावकर यांनी केले. उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रतिनिधी श्री. अमोल डकले यांनी मानले.

**१६) योग-प्राणायाम व शारीरिक कसतरती**

शिबिरात दररोज सकाळी योग-प्राणायाम व शारीरिक कसरती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यात महाविद्यालयातील कार्यक्रमाधिकारी व एन.एस.एस.प्रतिनिधी यांनी पहाटे ६.०० ते ७.०० या वेळेत योग, सुर्यनमस्कार, विविध आसणे जसे सर्वागासन, चक्रासन, वज्रासन इत्यादी प्रकार शिकविले.

**१७)शिबिरातील नाविन्यपूर्ण उपक्रम**

४. **स्वच्छतेसाठी व वृक्ष संवर्धनासाठी प्रभात फेरी:-** गावकऱ्यांना स्वच्छतेचे महत्त्व पटावे तसेच एक वृक्ष आपल्या जीवनात किती महत्त्वाचे योगदान देते याविषयी जनजागृती करण्यासाठी प्रभात फेरी काढण्यात येत होती.

५. **हगणदारी मुक्तीसाठी जनजागृती:-** गावकऱ्यांनी आपले गाव स्वच्छ रहावे म्हणून उघड्यावर शौचाला जाऊ नये. उघड्यावर शौच केल्यामुळे कोण-कोणत्या आरोग्य विषयक समस्या निर्माण होऊ शकतात या विषयी स्वयंसेवकांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले.

६. **एच.आय.व्ही. (एड्स) विषयी जनजागृतीसाठी रक्त तपासणी शिबिर:-** दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी फुलंब्री येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील लॅबटेक्निशन श्री. चौबे व श्रीमती काथार यांनी शिबिरातील सर्व स्वयंसेवक, प्राध्यापक आणि गावकऱ्यांची रक्त तपासणी करुन त्यांना एड्स आहे अथवा नाही याविषयीचा अहवाल लगेच दिला. तसेच एड्स आजार विषयी विद्यार्थी व गावकऱ्यांना माहिती दिली. सदरील शिबिरात १०५ व्यक्तींची एच.आय.व्ही. टेस्ट करण्यात आली. ऊन लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगितले.

१८) **सामाजिक सलोख्यासाठी मकर संक्रात निमित्त हळदी - कुंकू कार्यक्रमाचे आयोजन:-** महाविद्यालयातील स्वयंसेविकांचा गावातील महिला मंडळींशी सलोखा कायम रहावा म्हणून शिबिर समारोपाच्या दिवशी सकाळी सामुहिक हळदी - कुंकू  व वान वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयातील ४० स्वयंसेविकांनी गावातील महिलांना देण्यासाठी तीळगूळ व वानाचे सामान आणले होते. स्वयंसेविकांनी तसेच गावातील काही महिलांनी तीळगूळ, हळदी - कुंकू  आणि वान याचे एकमेकींना आदन प्रदान केले. एक आनंददायी सोहळा पार पडला.

१९) **व्यवनाधिनते विषयी जनजागृती:-** ग्रामस्वच्छतेच्या वेळेस स्वयंसेवकांना मोठ्या प्रमाणात दारुच्या बाटल्या सापडल्या. तसेच काही गावकऱ्यांनी चर्चे दरम्यान असे सांगितले की, गावात ९०% दारुची व्यसनाधिनता आहे, ज्यामुळे गावाचा म्हणावा तसा विकास होत नाही. म्हणून गावकऱ्यांशी व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम कळावेत म्हणून विविध व्याख्याने, कार्यक्रम व प्रभात फेरीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

२०) **श्रमदान:-** शिबिरात दररोज सकाळी ८.०० ते १२.३० या वेळेत श्रमदान घेण्यात आले. यात पुढील कामे करण्यात आली.

६. **गावाची व सार्वजनिक ठिकानांची सफाई:-**शिबिराच्या पहिल्या व उद्घाटन समारंभाच्या प्रसंगी स्वंयसेवकांनी गावातील सार्वजनिक ठिकानावरील व निवासाच्या ठिकानाची साफ सफाई केली. समाज मंदिराभोवतालचा परिसर स्वच्छ केला. गावातील सार्वजनिक ठिकाणे, शासकीय कार्यलये व शाळेचा आजुबाजुचा परिसर स्वच्छ केला व रस्त्याच्या आजुबाजुला जमा झालेला कचरा गोळा करून त्याची व्यवस्थित विल्हेवाट लावण्यात आली.

७. **नादुरूस्त नाल्यातील गाळ व कचरा साफ-सफाई:-**सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ओपन ड्रेनेज लाईन आहे. परंतु सततच्या वापरामुळे त्यात केरकचरा जाऊन बंद झाल्यामुळे सांडपाणी रस्त्यावरून वाहत असे. नादुरूस्त नाला दुरूस्त करून त्यातील केरकचरा स्वंयसेवकांनी साफ केला.

८. **वृक्षारोपन:-** गावातील प्रवेशद्वारापासूनच्या मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला शिवबाभूळ, आंबा, शिसम, चिंच, कडूलिंब इ. वृक्ष लावले गेले. त्यासाठी स्वयंसेवकांनी ग्रामस्थांनी खड्डे केले होते. त्यात मकर संक्रांतीच्या शुभ दिनी दिनांक १५ जानेवारी २०२० रोजी २० वृक्षांची रोपण करण्यात आली. जि. प. शाळेच्या तसेच गणेश मंदीर परिसरात देखील १० वृक्ष लावण्यात आले. सदरील वृक्षारोपन कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, प्राध्यापक आणि स्वयंसेवक हजर होते.

९. **जि. प. शाळेच्या दोन वर्ग खोल्यांची सफाई:-** जि. प. शाळेच्या दोन वर्ग खोल्या गेल्या ५ वर्षापासून बंद होत्या. एका वर्ग खोलीत तर कटींगच्या दुकानाचे साहित्य व केस पडलेले होते. या दोन्ही वर्ग खोल्यात गुडघ्यापर्यंत धूळ, माती, विष्टा पडलेली होती. जी स्वयंसेवकांनी एका दिवसात स्वच्द केली. ज्यामुळे अनेक वर्षापासून बंद असलेल्या दोन वर्ग खोल्या आता विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी वापरता येत आहे.

१०. **शौच खड्डे खोदणे:-** गावातील ज्या कुंटुंबाकडे शौचालये नव्हती अशा ४ कुंटुंबाला स्वयंसेवकांनी ५×६ फुटाचे शौच खड्डे खोदून दिले. एक शौच खड्डा जि. प. शाळेच्या परिसरात खोदण्यात आला. असे ५ शौचखड्डे खोदले गेले.

**२१) बौद्धिक सत्र**

विद्यार्थ्यांच्याविविध कला  गुणांचा विकास व्हावा व विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व बहरावे या कल्पनेतून विद्यार्थीमुख बौद्धिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात दररोज दुपारी ३ ते ४.३० या वेळेत बौद्धिक सत्र ठेवण्यात आले होते.

६. **दिनांक ११ जानेवारी २०२०:-** रोजी बौद्धिक सत्रात प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. मंजुषा नळगीरकर व प्रा. बाबासाहेब लहाने यांनी एन. एस. एस. शिबिराचे नियोजन व परिचय सत्र घेतले. ज्यात सात दिवसात केल्या जाणाऱ्या  कामाचे नियोजन, विद्यार्थ्यांनी कोणती शिस्त राखावी याविषयी मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी आपसात  स्वत:चा परिचय करुन दिला.

७. **दिनांक १२ जानेवारी २०२०:-** रोजीच्या बौद्धिक सत्रात महाविद्यालयातील एन. एस. एस. विभागात प्रभावीपणे कार्य केलेल्या माजी स्वयंसेवक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात सुहास दुतोंडे, पंकज साळवे, संदीप साळवे, सुनिल डिडोरे, गोरक्ष मंडळ यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. माजी स्वयंसेवक मेळाव्याचे अध्यक्षस्थान प्रा. बाबासाहेब लहाने यांनी भूषविले.

८. **दिनांक १३ जानेवारी २०२०:-** रोजी "व्यसनमुक्ती" या विषयावर महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक, डॉ. संजीवकुमार पांचाळ यांनी स्वयंसेवकांना व्यसनाधिनतेचे दुष्परिणाम व व्यसनाधिनते पासून दूर राहण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. सुरेश मुंढे यांनीही स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

९. **दिनांक १४ जानेवारी २०२०-** रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, श्री. शामसुंदर नाईक यांनी शिबिरास सदिच्छा भेट दिली. शिबिरातील स्वयंसेवकांशी उन्नत भारत अभियान आणि

ग्रामविकास या विषयावर चर्चा केली. तसेच दुपारच्या सत्रास राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. टी. आर. पाटील यांनी भेट दिली. आपत्ती व्यवस्थापन या विषयावरील बौद्धिक सत्रास प्रमुख वक्ते म्हणून डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर हे लाभले होते. त्यांनी आपत्ती व्यवस्थापन म्हणजे काय?, आपत्ती प्रकार आणि स्वयंसेवकाची जबाबदारी या विषयी सवितस्तर मार्गदर्शन केले. सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. टी. आर. पाटील यांनी भूषविले. डॉ. पाटील यांनी अध्यक्षीय समारोपात स्वच्छता व पर्यावरण संवर्धन या संकल्पने मागील विद्यापीठाची भूमिका या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कोल्हापूर येथील पूर ग्रस्तांना मदतीसाठी विद्यापीठाच्या एन. एस. एस. प्रतिनिधींनी केलेल्या कामाचे अनुभव कथन ही केले. सरांनी विद्यार्थ्यांसाठी ॲपल बोर आणले होते. ज्याचे वाटप कार्यक्रमानंतर करण्यसात आले. बौद्धिक सत्र संपल्यावर पाटील सरांनी शिबिरात आत्तापर्यंत केलेल्या कामाची पाहणी केली व विद्यार्थ्यांच्या कामाचे कौतुक केले.

१०. **दिनांक १५ जानेवारी २०२०:-** रोजी बौद्धिक सत्रात "एड्स जनजागृती" या विषयावर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात डॉ. महेश थोरात यांनी स्वयंसेवकांना एड्स पासून दूर राहण्याचे आवाहन केले.

**२२) सांस्कृतिक कार्यक्रम**

गावकऱ्यांचे मनोरंजनातून उद्‌बोधन व्हावे या दृष्टिने शिबिरात अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन ९.३० ते १०.३० करण्यात आले.

४. दिनांक ११ जानेवारी २०२० रोजी गावकऱ्यांचा व शिबिरार्थींचा संवाद घडवून आणला.
५. दिनांक १३ जानेवारी २०२० रोजी लहान्याची वाडी येथील महिला मंडळींनी ओवी व लोकगिते यांचे सादरीकरण केले.
६. दिनांक १५ जानेवारी २०२० रोजी गावातील लहान मुलांचा आणि स्वयंसेवकांचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

**२३) शिबीर समारोप**

दिनांक १७ जानेवारी २०२० रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत शिबिराचा समारोप झाला.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. संजय सांभाळकर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण केली जाते. शिबिराच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक जाणिव निर्माण केली जाते. ही सामाजिक जाणि घेऊन तयार झालेला युवक त्याच्या भविष्यकाळात समाज व राष्ट्र विकासात मोलाचे योगदान देऊ शकतो. या समारोप समारंभास श्री. पंढरिनाथ लहाने, तंटामुक्तीचे अध्यक्ष श्री. विष्णू लहाने, ग्रामपंचायत सदस्य श्री. गणेश लहाने व ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री. विष्णू लहाने यांनी तुकडोजी महाराज यांचा फोटो महाविद्यालयास भेट दिला. यात्रसंगी प्रा. नितीन माळेगावकर यांनी शिबिर कार्यक्रमातील विविध उपक्रमांचे अहवाल वाचन केले. त्यानंतर शिबिरासंदर्भातील मनोगते गावकऱ्यांनी व्यक्त केली. ज्यात श्री. पंढरिनाथ लहाने व श्री. विष्णू लहाने या ग्रामस्थांचा समावेश होता. स्वयंसेवकांपैकी श्री. अमोल डकले, श्री. राहूल सरोदे, कु. रुपाली नागरे, कु. मानसी पवार इ. यांनी आपली मनोगते व्यक्त केली. समारोप सत्रास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी असे मत व्यक्त केले की, गावाचा विकास सामुहिक प्रयत्नातून होऊ शकतो त्यासाठी गावकऱ्यांनी आप-आपसातील मतभेद , गट-तट बाजूला ठेवून एकत्र येणे गरजेचे आहे. समारोप सत्रास ग्रामस्थ, महिला, महाविद्यालयातील प्राध्यापक व स्वयंसेवक यांची उपस्थिती होती. शिबिर समारोप सत्राचे आभार डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी मांडले.

♦♦♦